# बृहन्मुंबई महानगरपालिका

वेतन विसंगती सुधारणा समिती 2022, अहवालाच्या शिफारशींवर आधारित वेतनश्रेणी सुधारणा अहवाल क्र.4 दि.01.07.2005 / 01.01.2006 पासून

महानगरपालिकेतील कर्मचारी / कामगार प्रवर्गांच्या वेतनश्रेणीमधील सुधारणा

परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/ आरजीसेल / 14 दि.23.10.2023

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक
## 2023-24

क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/14 दि.23.10.2023

विषय : बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांना वेतनश्रेणी सुधारणेमध्ये निर्माण झालेल्या विसंगती दूर करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वेतन विसंगती सुधारणा समिती 2022 च्या अहवालाची अंमलबजावणी करण्याबाबत – इतर संवर्ग

संदर्भ : 1) परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.2)/आरजीसेल/07 दि.30.09.2011

2) परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.2)/आरजीसेल/03 दि.16.05.2012

3) परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.2)/आरजीसेल/05 दि.17.06.2014

4) परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/06 दि.20.07.2019

5) परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/20 दि.17.09.2019

6) मा.महानगरपालिका आयुक्त यांची मंजूरी क्र.एमजीसी/एफ/7238 दि.08.07.2022

7) परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/07 दि.11.07.2022

8) परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/14 दि.21.10.2022

9) परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/19 दि.23.11.2022

10) परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/10 दि.08.09.2023

11) मा.महानगरपालिका आयुक्त यांची मंजूरी क्र.एमजीसी/एफ/990 दि.23.10.2023

राज्य शासनाने सातव्या वेतन आयोगानुसारच्या वेतनश्रेणी कर्मचा-यांना लागू केल्या. त्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी दि.01.01.2016 पासून लागू करण्याबाबतचे उपरोक्त संदर्भाधीन क्र.4 चे परिपत्रक निर्गमित करण्यात आले.त्या अनुषंगाने वेतन श्रेणींची अंमलबजावणी करण्यात आली.

परंतु कर्मचा-यांचे सहाव्या वेतन आयोगातील श्रेणी वेतन (GRP) बाबतचे विसंगतीचे प्रश्न प्रलंबित होते. त्या अनुषंगाने वेतन विसंगती सुधारणा समिती 2019 स्थापन करण्यात आली.सदर समिती निवृत्त सनदी अधिकारी श्री.व्ही.गिरिराज यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली होती.सदर समितीने विविध संघटनांची निवेदने,संबंधित खात्याने सादर केलेली निवेदने,कर्मचाऱ्यांची वैयक्तिक निवेदने यांचा अभ्यास करून आपला अहवाल माननीय महानगरपालिका आयुक्त यांना सादर केला.सदर शिफारशींच्या अनुषंगाने मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरीने संदर्भ क्र.7 अन्वये परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

श्री.व्ही.गिरिराज यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने काही संवर्गाबाबत नवीन समिती स्थापन करण्याबाबत शिफारस केली होती.तसेच सहाव्या वेतन आयोगातील श्रेणी वेतनातील (GRP) विसंगतीची अनेक निवेदने संघटना/खाते/वैयक्तिक यांच्याकडून प्राप्त होत होती.त्या अनुषंगाने मा.महानगरपालिका

आयुक्त यांच्या मंजूरीने डॉ.रमानाथ झा,निवृत्त सनदी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वेतन विसंगती सुधारणा समिती 2022 स्थापन करण्यात आली.सदर समितीने प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन त्यासंदर्भात अभ्यास करुन आपला अहवाल मा.महानगरपालिका आयुक्त यांना दि.01.09.2023 रोजी सादर केला.

माननीय महानगरपालिका आयुक्त व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या समवेत मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या दालनात दि.05.09.2023 रोजी झालेल्या बैठकीत 'अभियंता' संवर्ग यांचेबाबतीत सदर अहवालामध्ये दिलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यास संमती दिली आहे.त्या अनुषंगाने संदर्भ क्र.10 अन्वये परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

तसेच दि.15.09.2023 रोजी मा.महानगरपालिका आयुक्त यांचे दालनात समितीने दिलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने इतर संवर्गाबाबत बैठक आयोजित करण्यात आली.सदर बैठकीत 'अभियंता' संवर्गाव्यतिरिक्त इतर संवर्गाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत मा.महानगरपालिका आयुक्त व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांनी संमती दिली.सदर अहवालातील शिफारशी व दि.15.09.2023 रोजी मा.महानगरपालिका आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांच्या वेतनश्रेणींची खाली नमूद केल्याप्रमाणे नव्याने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

1) सदर समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक विभागनिहाय तक्ते,वैयक्तिक निवेदनांवरील शिफारशी,मुद्देनिहाय शिफारशी व अन्य सर्वसाधारण शिफारशी सोबत जोडण्यात आल्या आहेत.सदर निर्देश काटेकोरपणे अभ्यासणे आवश्यक आहे.समितीने दिलेल्या शिफारशीनुसार ज्या संवर्गातील कर्मचारी/अधिकारी यांच्या श्रेणी वेतनात बदल सुचविलेला आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांची श्रेणी वेतन (GRP) नुसार संबंधित Pay Band मध्ये वेतन निश्चिती करणे आवश्यक आहे.तसेच अहवालामध्ये दिलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने नमूद केलेल्या निर्देशानुसार संबंधित खात्याने सुयोग्य अशी भूमिका घेऊन सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.
2) सदर समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने अनुज्ञेय असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांचे सहाव्या वेतन आयोगातील (दि.01.07.2005/दि.01.01.2006 ते दि.31.12.2015 या कालावधीतील) वेतन निश्चिती मानीवरित्या करणे आवश्यक आहे.तसेच दिलेले निर्देश देखील विचारात घेणे आवश्यक आहे.
3) समितीने सुचविलेल्या श्रेणी वेतन (GRP) च्या अनुषंगाने संबंधित Pay Band मध्ये सहाव्या वेतन आयोगात मानीवरित्या दि.01.07.2005/दि.01.01.2006 पासून नव्याने वेतननिश्चिती करून दि.01.01.2016 रोजी सातव्या वेतन आयोगानुसार संबंधित Pay Matrix मध्ये सुधारित वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.
4) सदर समितीने सह आयुक्त पदास PB4 - रु.37400-67000 + श्रेणी वेतन 9400 ह्या वेतनश्रेणीची शिफारस केली आहे.महाराष्ट्र शासनात सदर श्रेणी वेतन उपलब्ध नाही.त्याअनुषंगाने शासनामधील इतर नजीकच्या श्रेणी वेतनाचा आधार घेऊन रु.9400 श्रेणी वेतना करिता सातव्या वेतन आयोगातील M45 नवीन 'Pay Matrix Table' तयार करण्यात आले आहे.

5) तसेच समितीने त्यांच्या समोर प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय शिफारशी व अन्य सर्वसाधारण शिफारशी केल्या आहेत.संबंधित खात्याने सदर शिफारशी लक्षात घेऊन त्या अनुषंगाने सुयोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

6) सदर समितीकडे विविध कर्मचा-यांकडून त्यांची वैयक्तिक निवेदने प्राप्त झाली.त्यापैकी जास्तीत जास्त निवेदनांबाबतचे अभिप्राय अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहेत.तथापि, एखादी कर्मचारी संघटना किंवा एखादे वैयक्तिक निवेदन अहवालात नमूद करावयाचे राहिले असल्यास त्याबाबत कोणतीही वाढ/बदल करण्याची शिफारस करावयाची नाही असे सदर समितीने सूचित केले आहे.

7) डॉ.रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या वेतन विसंगती सुधारणा समिती 2022 ने दिलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने- .

अ) अनुज्ञेय असलेल्या कर्मचारी/अधिकारी व निवृत्तीवेतनधारक यांची सहाव्या वेतन आयोगातील वेतन निश्चिती दि.01.07.2005/दि.01.01.2006 ते दि.31.12.2015 पर्यंत मानीवरीत्या करून, दि.01.01.2016 रोजी सातव्या वेतन आयोगानुसार देखील सुधारित वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.सदर सुधारणेमुळे दि.01.01.2016 पासून अनुज्ञेय असलेल्या थकबाकीचे अधिदान संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना देय करण्यात यावे.

ब) दि.01.01.2016 नंतर सेवानिवृत्त/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना अनुज्ञेय असल्यास दि.01.01.2016 पासून वेतन थकबाकी/निवृत्तीवेतन थकबाकी व सेवानिवृत्त विषयक लाभ यांचे अधिदान करण्यात यावे.

क) दि.01.07.2005/दि.01.01.2006 ते दि.31.12.2015 या कालावधीतील सेवानिवृत्त कर्मचा-यांना/ वारसांना सुधारित निवृत्तीवेतनाचा लाभ अनुज्ञेय असेल.

8) थकबाकी देय करणेसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

i) लेखा पडताळणी केलेल्या वेतननिश्चिती प्रपत्रानुसार आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये कर्मचाऱ्याचे वेतन मानव संसाधन कार्यप्रणालीत अद्ययावत केल्यास,एकूण थकबाकीच्या 1/3 हप्त्याचे अधिदान सदर आर्थिक वर्षात देय करण्यात यावे व उर्वरित 2 हप्त्याचे अधिदान प्रत्येकी 1/3 याप्रमाणे पुढील 2 आर्थिक वर्षात देय करण्यात यावे.

ii) लेखा पडताळणी केलेल्या वेतननिश्चिती प्रपत्रानुसार आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये कर्मचाऱ्याचे वेतन मानव संसाधन कार्यप्रणालीत अद्ययावत न करता 2025-26 या आर्थिक वर्षात सदर वेतन अद्ययावत केल्यास, त्या आर्थिक वर्षात 2/3 व उर्वरित 1/3 अधिदान त्यापुढील आर्थिक वर्षात देय करण्यात यावे.

iii) लेखा पडताळणी केलेल्या वेतननिश्चिती प्रपत्रानुसार आर्थिक वर्ष 2026-27 मध्ये वा त्यानंतरच्या आर्थिक वर्षात कर्मचाऱ्याचे वेतन मानव संसाधन कार्यप्रणालीत अद्ययावत केल्यास,100% थकबाकीचे अधिदान त्या आर्थिक वर्षात देय करण्यात यावे.

**9) सदर थकबाकीच्या अधिदानाबाबतची कार्यवाही इतर संवर्गाबरोबर अभियंता संवर्गास सुद्धा लागू करण्यात येत आहे.**

अनु.क्र.7 स्थित अ,ब,क मधील नमूद कर्मचा-यांना दि.01.07.2005/दि.01.01.2006 ते दि.31.12.2015 या कालावधीतील थकबाकी मिळणार नाही. तथापि अ,ब,क मधील नमूद कर्मचा-यांच्या

वेतननिश्चितीची/निवृत्तीवेतनाची लेखापडताळणी झाल्यानंतरच सर्वांना अधिदान होईल याची दक्षता घेण्यात यावी.

सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख / अधिष्ठाता यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी व्यक्तीश: वरील सूचना काळजीपूर्वक अभ्यासून त्यांच्या अखत्यारितील आस्थापना कर्मचा-यांना मार्गदर्शन करावे व त्यानुसार विहित कालावधीत वेतननिश्चितीची लेखा पडताळणी व आकारणी होईल याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रकाची प्रत महानगरपालिकेच्या intranet वर ftp://hr.mcgm.gov.in/Circular/GAD/Dy.C.A.Estt./Rgcell या साईटवर उपलब्ध आहे.

सही/- दि.16.10.2023
श्रीम.वैशाली देसाई
उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)

सही/- दि.16.10.2023
श्री.प्रदिप पडवळ
प्रमुख लेखापाल (वित्त) (प्र.)

सही/- दि.16.10.2023
श्री.प्रशांत गायकवाड
उप आयुक्त (वित्त) (प्र.)

सही/- दि.16.10.2023
श्री.मिलिन सावंत
सह आयुक्त (सा.प्र.)

सही/- दि.16.10.2023
डॉ.अश्विनी जोशी
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही/- दि.17.10.2023
श्री.पी.वेलरासू
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प)

सही/- दि.20.10.2023
डॉ.इ सिं चहल
मा.महानगरपालिका आयुक्त

**परिपत्रक**

2023-2024

क्रमांक : साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था.2)/आरजीसेल/14 दि.23.10.2023

प्रत -------------------------------- यांना (----------------------------------ज्यादा प्रतींसह ) माहितीसाठी आणि आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना.

RSW 23/10/23

उप प्रमुख लेखापाल (आस्था.2) यांजकरिता

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 1 | उद्यान विभाग – विविध संवर्ग |
| 2 | आरोग्य खाते – समन्वयक / बहुउद्देशीय कार्यकर्ता (Coordinator / Multi-purpose Worker) |
| 3 | आरोग्य खाते – किटक नाशक अधिकारी |
| 4 | आरोग्य खाते – अन्न निरिक्षक |
| 5 | आरोग्य खाते – महानगरपालिका विश्लेषक, दादर प्रयोगशाळा |
| 6 | आरोग्य खाते – Assistant Chemist & Assistant Bacteriologist |
| 7 | आरोग्य खाते – आरोग्य खात्यातील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी |
| 8 | आरोग्य खाते – परिचारिका संवर्ग |
| 9 | आरोग्य खाते (सर्व रुग्णालये) संवर्ग – व्रणोपचारक |
| 10 | आरोग्य खाते – विस्तारित प्रशिक्षक |
| 11 | आरोग्य खाते – जन्म / मृत्यू नोंदणी कारकून |
| 12 | आरोग्य खाते – प्रयोगशाळा सहाय्यक |
| 13 | कस्तुरबा सेंट्रल लॅब – वरिष्ठ विश्लेषक |
| 14 | कस्तुरबा रुग्णालय – रोगाणूनाशक परिचर |
| 15 | मानव संसाधन विभाग – |
| 16 | चौकशी विभाग – विविध संवर्ग |
| 17 | प्रमुख रुग्णालये – Physiotherapist & Occupational Therapist |
| 18 | प्रमुख रुग्णालये – उप अधिक्षक (औषध निर्माण शाळा) |
| 19 | प्रमुख रुग्णालये – सहाय्यक वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अधिष्ठाता, उप अधिष्ठाता |
| 20 | प्रमुख रुग्णालये – तंत्रज्ञ संवर्ग – क्ष-किरण तंत्रज्ञ |
| 21 | प्रमुख रुग्णालये - नायर रुग्णालय व दंत महाविद्यालय – दंत यांत्रिक संवर्ग |
| 22 | प्रमुख रुग्णालये – रक्तपेढी तंत्रज्ञ |
| 23 | प्रमुख रुग्णालये – प्रयोगशाळा विभाग – वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी |
| 24 | प्रमुख रुग्णालये – ग्रंथपाल |
| 25 | प्रमुख रुग्णालये – संजीवन शास्त्रज्ञ (Perfusionist) |
| 26 | प्रमुख रुग्णालये – आहारतज्ञ |
| 27 | प्रमुख रुग्णालये – लोकमान्य टिळक महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय – नाभिक संवर्ग |
| 28 | जनसंपर्क विभाग- विविध संवर्ग |

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 29 | राजशिष्टाचार व संपर्क विभाग |
| 30 | वसाहत खाते – वरिष्ठ वसाहत अधिकारी |
| 31 | दुकाने व आस्थापना विभाग – विविध संवर्ग |
| 32 | दुकाने व आस्थापना विभाग – दुकान परिचर |
| 33 | महापालिका चिटणीस विभाग |
| 34 | सामान्य प्रशासन विभाग – सहाय्यक आयुक्त |
| 35 | सामान्य प्रशासन विभाग - महापालिका उप आयुक्त |
| 36 | नियोजन विभाग - समाज विकास अधिकारी |
| 37 | करनिर्धारण व संकलन विभाग - श्री संभाजी प्रकाश टेकवडे, रोखपाल |
| 38 | करनिर्धारण व संकलन विभाग– विविध संवर्ग |
| 39 | सुरक्षा विभाग |
| 40 | जल अभियंता विभाग – बिनतारी पर्यवेक्षक |
| 41 | जल अभियंता विभाग–पिसे पांजरापूर, भांडूप संकुल, दादर (मलजल) येथील प्रयोगशाळा |
| 42 | नगर अभियंता विभाग - आरेखक |
| 43 | नगर अभियंता विभाग –ओव्हरसिअर (NQO) |
| 44 | अभियांत्रिकी विभाग - विविध संवर्ग |
| 45 | अभियांत्रिकी विभाग – वास्तुशास्त्रज्ञ |
| 46 | अनुज्ञापन विभाग |
| 47 | महापालिका मुख्य लेखा परिक्षक |
| 48 | महानगरपालिका मुद्रणालय– विविध संवर्ग |
| 49 | महानगरपालिका मुद्रणालय– श्री. योगेश दामु साळुंके व श्री. नंदकुमार गणपत कोटकर, सहाय्यक व्यवस्थापक |
| 50 | प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) – प्रशितन विभाग (Refrigeration Deptt.) |
| 51 | प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांच्या अखत्यारीतील कार्यशाळा - विविध संवर्ग |
| 52 | कामगार विभाग – Assistant Labour Welfare Officer |
| 53 | प्रमुख कामगार अधिकारी – दूरध्वनी चालक |
| 54 | सामान्य प्रशासन विभाग - लघुलेखक संवर्ग |
| 55 | बाजार विभाग |
| 56 | घनकचरा व्यवस्थापन विभाग – विविध संवर्ग |
| 57 | घनकचरा व्यवस्थापन खाते अंतर्गत परिवहन विभागातील विविध संवर्ग |

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 58 | प्रमुख कर्मचारी अधिकारी विभाग – विविध संवर्ग |
| 59 | प्रमुख कर्मचारी अधिकारी -नोंदणी सहाय्यक |
| 60 | प्रमुख कर्मचारी अधिकारी व महानगरपालिकेतील इतर विभाग - शिपाई ते मुख्य जमादार संवर्ग |
| 61 | प्रमुख लेखापाल (वित्त) |
| 62 | विधी विभाग - विविध संवर्ग |
| 63 | शिक्षणविभाग - विशेष शिक्षक |
| 64 | शिक्षण विभाग - स्काऊटस् आणि गाईडस् |
| 65 | शिक्षण विभाग - प्राथमिक शिक्षक संवर्ग |
| 66 | शिक्षण विभाग - माळी-नि-रखवालदार |
| 67 | आधार सामग्री संस्करण विभाग- विविध संवर्ग |
| 68 | माहिती तंत्रज्ञान विभाग |
| 69अ | मुंबई अग्निशमन दल – विविध संवर्ग |
| 69ब | मुंबई अग्निशमन दल – कार्यशाळा तांत्रिक कर्मचारी वर्ग |
| 70 | प्रमुख अभियंता(मलनि:सारण प्रचालन) / प्रमुख अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या) - गटार स्वच्छक (मलनि:सारण प्रचालन निरिक्षक) |
| 71 | रस्ते दुरुस्ती व मलनि:सारण प्रचालन, पर्जन्य जल वाहिन्या व जल अभियंता विभागातील कामगार संवर्ग |
| 72 | संशोधन अधिकारी |
| | वैयक्तिक निवेदनांबाबत समितीने केलेल्या शिफारशी |
| | समितीने केलेल्या मुद्येनिहाय शिफारशी |
| | समितीने केलेल्या अन्य सर्वसाधारण शिफारशी |

## (1) उद्यान विभाग – विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| २ | उप उद्यान अधिक्षक | 9300-34800 + GRP 4500 | 9300-34800 + GRP 5400 |
| ३ | सहाय्यक उद्यान अधिक्षक | 9300-34800 + GRP 4400 | 9300-34800 + GRP 4800 |
| ४ | उद्यान विद्या सहाय्यक/ कनिष्ठ वृक्ष अधिकारी | 5200-20200 + GRP 2800 | 9300-34800 + GRP 4200 |

**अभिप्राय -**

सदर खात्यामधील पदांच्या अर्हता व कामाची व्याप्ती लक्षात घेण्याजोगी आहे. शहरी वनीकरणे, पर्यावरण संरक्षण, जैव विविधा घटकांची उन्नती इ. प्रकारच्या कामाचे स्वरुप लक्षात घेता सदर सुधारणा करण्यात आली आहे.

(2) आरोग्य खाते – समन्वयक / बहुउद्देशीय कार्यकर्ता (Coordinator / Multi-purpose Worker)

| अ. क्र. | पदनाम | ६ व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | मा.गिरीराज समितीच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६ व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|---|
| १ | श्वान नियंत्रण अधिकारी / कोंडवाडा अधिकारी (श्वान नियंत्रण विभाग / कोंडवाडा विभाग) | 9300-34800 + GRP 4200 | बदल नाही. | 9300-34800 + GRP 4300 |
| २ | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक / सहाय्यक कोंडवाडा अधिकारी (अे ते टी विभाग, रुग्णालये व श्वान नियंत्रण विभाग) / कोंडवाडा विभाग) | 5200-20200 + GRP 2800 | 5200-20200 + GRP 2800 | 9300-34800 + GRP 4200 |
| ३ | स्वच्छता निरीक्षक / पर्यवेक्षीय कनिष्ठ अवेक्षक (अे ते टी विभाग, रुग्णालये व प्रसुतीगृहे) / किटकनाशक विभाग) | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |
| ४ | कनिष्ठ अवेक्षक / संनिरीक्षण निरीक्षक / क्षयरोग निरीक्षक) (किटकनाशक विभाग/ कोंडवाडा विभाग / श्वान नियंत्रण विभाग(संनिरिक्षण विभाग/ क्षयरोग नियंत्रण विभाग) | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2400 |

| अ. क्र. | पदनाम | ६ व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | मा.गिरीराज समितीच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६ व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|---|
| ५ | सार्वजनिक आरोग्य खात्यातील निम्न संवर्गामध्ये काम करीत असलेल्या संनिरीक्षण अन्वेक्षण अन्वेषक, उपचार संघटक / बहुउद्देशीय कार्यकर्ता, समन्वयक, शिपाई, डी.एस.आय. /जन्म / मृत्यू नोंदणी कारकून, कामगार व तत्सम संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून | 5200-20200 + GRP 1900 व त्यापेक्षा कमी. | यापैकी स्वच्छता निरिक्षक ही पदविका उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना - 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 1900 व त्यापेक्षा कमी. स्वच्छता निरिक्षक ही पदविका उत्तीर्ण झालेल्या कर्मचा-यांना GRP 2400 लागू होणार नाही. (सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून) |

**अभिप्राय –**

मा. गिरीराज समितीने 'स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण झालेल्या निम्न संवर्गातील सर्वांना रु. २४००/- श्रेणीवेतन अनुज्ञेय करावे' ही शिफारस सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर नव्याने स्वच्छता निरिक्षक पदविका उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांना लागू होणार नाही.

तथापि, आरोग्य विभागाच्या संबंधित आस्थापनाने मा.गिरीराज समितीच्या अहवालानुसार रु.२४००/- श्रेणीवेतन दिले असल्यास त्यांना सद्य परिस्थितीत (अनिवार्य परिस्थितीत) *Fait accompli* कनिष्ठ अवेक्षक / संनिरिक्षण निरिक्षक / क्षयरोग निरिक्षक या पदांवर, पदांची उपलब्धता व पदोन्नतीच्या प्रचलित पध्दतीचा वापर करुन त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी. तोपर्यंत कनिष्ठ अवेक्षक पदाच्या भरतीसाठी परिपत्रक निर्गमित करण्यात येऊ नये. पदोन्नतीने नियुक्त होणा-या महानगरपालिका सेवानियमावली नियम क्र.३२ चा लाभ देण्यात यावा. तसेच अपात्र ठरणा-या कर्मचा-यांना किंवा पदोन्नती नाकारणा-या कर्मचा-यांना रु. २४००/- श्रेणीवेतन न देता, निम्न पदाची वेतनश्रेणी व श्रेणीवेतन लागू करावे.

पूर्वीच्याच पध्दतीने कनिष्ठ अवेक्षक / संनिरिक्षण निरिक्षक / क्षयरोग निरिक्षक यांची निवड करावी व पूर्वीच्या पदशृंखलेप्रमाणे त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

## (3) आरोग्य खाते – किटक नाशक अधिकारी –

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | किटक नाशक अधिकारी | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4400 |

**अभिप्राय –**

वेतन विसंगती समिती २०१९ मध्ये सहाय्यक किटक नाशक अधिकारी व उप किटक नाशक अधिकारी यांच्या श्रेणीवेतनामध्ये राज्य शासनाच्या धर्तीवर सुधारणा करण्यात आली असल्याने पुन्हा नविन सुधारणा करण्यात आली नाही. विभाग कार्यालयात काम करणा-या किटक नाशक अधिकारी यांच्या व्यग्र कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या श्रेणीवेतनात वाढ करण्यात आली आहे.

## (4) आरोग्य खाते –अन्न निरिक्षक

श्रेणी वेतनाच्या वाढीबाबत योग्य समर्थन प्राप्त न झाल्यामुळे कोणताही बदल न करता यापूर्वीच्या वेतन विसंगती समिती २०१९ ने केलेली शिफारस कायम ठेवण्यात आली आहे.

## (5) आरोग्य खाते –महानगरपालिका विश्लेषक, दादर प्रयोगशाळा

वेतन विसंगती समिती २०१२ ने या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये केलेली वाढ लक्षात घेता कोणताही बदल न करता या पूर्वीच्या वेतन विसंगती समिती २०१९ ने केलेली शिफारस कायम ठेवण्यात आली आहे.

## (6) आरोग्य खाते – Assistant Chemist & Assistant Bacteriologist

**अभिप्राय -**

वेतन विसंगती समिती २०१२ ने या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये केलेली वाढ लक्षात घेता कोणताही बदल न करता या पूर्वीच्या वेतन विसंगती समिती २०१९ ने केलेली शिफारस कायम ठेवण्यात आली आहे.

## (7) आरोग्य खाते – आरोग्य खात्यातील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी

**अभिप्राय –**

मा.गिरीराज यांच्या अध्यक्षतेखालील वेतन विसंगती समितीने वैदयकीय महाविदयालयाशी संलग्न असलेल्या प्रमुख रुग्णालयामधील सहाय्यक वैदयकीय अधिकारी यांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ केली आहे. तथापि, प्रमुख रुग्णालयामधील प्रचंड रुग्णसंख्या व तेथील कामाचे स्वरुप, जटिल कामे तसेच कामाचा प्रचंड आवाका लक्षात घेऊन सदर श्रेणीवाढ करण्यात आली आहे. त्यामुळे कार्यकारी आरोग्य अधिकारी या खात्यामधील सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या कामाचा आवाका लक्षात घेता सदर श्रेणीवाढ या संवर्गाला लागू करण्यात आलेली नाही.

## (८) आरोग्य खाते – परिचारिका संवर्ग

**अभिप्राय –**

'परिचारिका' संवर्गाला राज्य शासनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी व श्रेणीवेतन देण्यात येत आहे. त्यामुळे केंद्र शासनाप्रमाणे श्रेणीवेतन देण्याची शिफारस करण्यात आली नाही.

तथापि कोव्हीड कालावधीत या संवर्गातील कर्मचा-यांनी केलेली कामे उल्लेखनीय होती त्याचा विचार होणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाप्रमाणे परिचारिका संवर्गाला Nursing Allowance च्या धर्तीवर प्रतीमाह रु.५००/-'तणाव भत्ता' (Stress Allowance) देण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली आहे. सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून 'तणाव भत्ता' अनुज्ञेय होईल.

## (९) आरोग्य खाते (सर्व रुग्णालये) संवर्ग – व्रणोपचारक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | व्रणोपचारक | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 |

**अभिप्राय –**

व्रणोपचारक या संवर्गातील कर्मचा-यांच्या कामाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेता त्यांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (10) आरोग्य खाते – विस्तारित प्रशिक्षक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतन श्रेणी व श्रेणी वेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतन श्रेणी व श्रेणी वेतन |
|---|---|---|---|
| १ | विस्तारित प्रशिक्षक | 5200 – 20200 + GRP 2000 | 9300– 34800 + GRP 4200 |

**अभिप्राय –**

सन २००० पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विस्तारित प्रशिक्षक' व 'सार्वजनिक आरोग्य परिचारिका'या दोन्ही पदांची वेतनश्रेणी सारखीच होती. सदर बाब लक्षात घेता 'विस्तारित प्रशिक्षक' संवर्गाच्या वेतनश्रेणी व श्रेणीवेतनात सार्वजनिक आरोग्य परिचारिका संवर्गाप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे.

सदर संवर्गातील रिक्त पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही संबंधित खात्यामार्फत करण्यात यावी.

## (11) आरोग्य खाते – जन्म / मृत्यू नोंदणी कारकून

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | जन्म मृत्यू नोंदणी कारकून | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 |
| २ | मृत्यू नोंदणी कारकून | | |
| ३ | कारकून (जन्म नोंदणी) | | |
| ४ | कारकून (मृत्यू नोंदणी) | | |

**अभिप्राय –**

सदर पदांच्या कामाचे स्वरुप व नागरिकांशी येणारा सततचा संपर्क ही बाब विचारात घेऊन त्यांना'ड' संवर्गातून 'क'संवर्गात वर्ग करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.एमपीएम/२/२२०३, दि.१८.०४.२०२३ मधील तरतूदीनुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.

## (12) आरोग्य खाते – प्रयोगशाळा सहाय्यक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा सहाय्यक | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 |

**अभिप्राय** –

'प्रयोगशाळा तंत्रज्ञ' या पदाकडे बी.एस.सी. सोबत तांत्रिक अर्हता सुध्दा असते. या कारणास्तव 'प्रयोगशाळा तंत्रज्ञ' या पदाइतके श्रेणीवेतन 'प्रयोगशाळा सहाय्यक' या पदास लागू करणे संयुक्तिक नाही.

तथापि, राज्य शासनाच्या धर्तीवर 'प्रयोगशाळा सहाय्यक' या पदाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (13) कस्तुरबा सेंट्रल लॅब –वरिष्ठ विश्लेषक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ औषध विश्लेषक | 9300 – 34800 + GRP 4800 | 9300 – 34800 + GRP 5400 |
| २ | सहाय्यक औषध विश्लेषक | 9300 – 34800 + GRP 4300 | 9300 – 34800 + GRP 4800 |

**अभिप्राय** -

कस्तुरबा रुग्णालयामधील प्रयोगशाळेत कार्यरत असलेल्या सहाय्यक औषध विश्लेषक / वरिष्ठ औषध विश्लेषक यांची कर्तव्ये व जबाबदा-या तसेच त्यांनी नमूद केलेली शासनामधील समकक्ष पदांची वेतनश्रेणी लक्षात घेता सदर पदांच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (14) कस्तुरबा रुग्णालय – रोगाणूनाशक परिचर

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | रोगाणूनाशक परिचर | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 |

**अभिप्राय** -

सदर पदधारकाकडे तांत्रिक अर्हता असते. यास्तव संसर्गजन्य रोग्यांच्या कपडयांचे निर्जंतूकीकरण करण्याचे जोखमीचे व विशेष अपवादात्मक काम लक्षात घेऊन सदर पदाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (15) मानव संसाधन विभाग –

**अभिप्राय –**

वेतन विसंगती समिती २०१९ ने अंतर्भूत केलेली बी.एस.सी.(आय.टी.) ही अर्हता वगळण्याबाबत मा.आयुक्तांची क्र.एमजीसी/एफ/८९६४, दि.१७.०२.२०२३अन्वये मंजूरी प्राप्त करण्यात आली आहे. यास्तव, सदर अट वगळून वेतन विसंगती समिती २०१९ ने शिफारस केलेली सुधारित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन दि. १ मार्च २०१५ पासून सर्व पदांना लागू करण्यात यावी.

## (16) चौकशी विभाग – विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख अधिकारी (चौकशी) | 15600– 39100 + GRP 6600 | 15600– 39100 + GRP 7300 |
| २ | उप प्रमुख अधिकारी (चौकशी) | 9300– 34800 + GRP 5400 | 15600– 39100+ GRP 6600 |
| ३ | सहाय्यक प्रमुख अधिकारी (चौकशी) | 9300– 34800 + GRP 4800 | 9300– 34800 + GRP 5400 |
| ४ | अन्वेषण अधिकारी | 9300– 34800 + GRP 4300 | 9300– 34800 + GRP 4600<br>सदर सुधारित श्रेणीवाढ सुधारित अर्हतेनुसार भरण्यात येणा-या पदांना लागू होईल. |

**अभिप्राय –**

सदर खात्यामार्फत जास्तीत जास्त अधिका-यांची प्रकरणे खातेस्तरावर हाताळणे शक्य व्हावे याकरिता सदर खात्याच्या खातेप्रमुखाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

'अन्वेषण अधिकारी' पदाच्या अर्हता बदलणे आवश्यक आहे. या विभागातील 'अन्वेषण अधिकारी' ही पदे मुख्य लिपिक पदावर 3 वर्षे सेवा झालेल्या कर्मचा-यांमधून, परिक्षा तसेच मुलाखतीद्वारे भरण्यात यावी. तसेच कायदेविषयक पदवी धारण करत असलेल्या उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

## (17) प्रमुख रुग्णालये – Physiotherapist & Occupational Therapist

**अभिप्राय –**

सदर संवर्गाचे श्रेणीवेतन राज्य शासनाच्या श्रेणीवेतनानुसारच आहे. तसेच कालबध्द पदोन्नतीकरिता एकाकी पदासाठी अनुज्ञेय केलेले श्रेणीवेतन त्यांना लागू करण्यात आले आहे. यास्तव दर्जा पदोन्नती बाबतची शिफारस करण्यात आली नाही.

## (18) प्रमुख रुग्णालये – उप अधिक्षक (औषध निर्माण शाळा)

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | अधिक्षक (औषध निर्माण शाळा) | 9300 – 34800 + GRP 4800 | 9300 – 34800 + GRP 5400 |
| २ | उप अधिक्षक (औषध निर्माण शाळा) | 9300 – 34800 + GRP 4600 | 9300 – 34800 + GRP 4800 |

**अभिप्राय –**

सन २०१२ मधील वेतन विसंगती समितीच्या शिफारशीनुसार उप अधिक्षक (औषध निर्माण शाळा) व अधिक्षक (औषध निर्माण शाळा) ही मृतवत करण्यात आलेली पदे पुनर्जिवित करण्यात यावी.

(उप अधिक्षक (औषध निर्माण शाळा) या संवर्गातील पदे पुनर्जिवित करण्याचा प्रस्ताव सर्व मोठया रुग्णालयामधील अधिष्ठाता / उप आयुक्त (आरोग्य) यांच्या शिफारशीसह सदर विसंगती समितीसमोर प्राप्त झाला.)

शासनाकडील समकक्ष पदांच्या धर्तीवर सदर पदांच्या श्रेणी वेतनात वाढ करण्यात आली आहे.

## (19) प्रमुख रुग्णालये–सहाय्यक वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अधिष्टाता, उप अधिष्टाता

**अभिप्राय** -

मान.गिरीराज समितीने या संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ केली आहे. सदर पदांना विद्यापीठ अनुदान आयोग लागू नसल्याने डायनेमिक एश्योर्ड करियर प्रोग्रेशन (DACP) तसेच NPPA लागू करता येणार नाही.

## (20) प्रमुख रुग्णालये – तंत्रज्ञ संवर्ग – क्ष-किरण तंत्रज्ञ

मा. गिरीराज समितीने यापूर्वीच एकाकी पदाच्या कालबध्द पदोन्नतीच्या श्रेणी वेतनामध्ये वाढ केली आहे. सदर वाढ लक्षात घेता पुन्हा या संवर्गाच्या कालबध्द पदोन्नतीच्या श्रेणी वेतनामध्ये वाढ करण्यात आली नाही.

## (21) प्रमुख रुग्णालये - नायर रुग्णालय व दंत महाविद्यालय – दंत यांत्रिक संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | मुख्य दंत यांत्रिक | 5200 – 20200 + GRP 2800 | 9300 – 34800 + GRP 4200 |
| २ | दंत यांत्रिक | 5200 – 20200 + GRP 2400 | 5200 – 20200 + GRP 2800 |

**अभिप्राय -**

सदर पदधारक करत असलेले कामकाज कौशल्याचे असून त्याला वाढती मागणी आहे. शासनाकडील वेतनश्रेणी व श्रेणीवेतन लक्षात घेता त्यांच्या वेतनश्रेणी मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (22) प्रमुख रुग्णालये – रक्तपेढी तंत्रज्ञ

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | रक्तपेढी तंत्रज्ञ | 9300 – 34800 + GRP 4200 | 9300 – 34800 + GRP 4300 |

**अभिप्राय –**

रक्तपेढी तंत्रज्ञ यांना असलेला 6 महिन्यांचा रक्तपेढी तंत्रज्ञाचा अनुभव व महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध विभागाचे अनुज्ञापत्र या बाबी लक्षात घेता श्रेणी वेतना मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

Technical Supervisor ची पदे निर्माण करण्याच्या मागणीबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

## (23) प्रमुख रुग्णालये – प्रयोगशाळा विभाग – वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी

**अभिप्राय –**

वेतन विसंगती समिती २०१२ च्या शिफारशीनुसार कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी व वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी ही पदे एकत्रित करुन त्यांना रु. ४३००/- श्रेणीवेतनामध्ये वाढ करुन रु.४८००/- श्रेणीवेतन करण्यात आले आहे. त्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या पदाला म्हणजेच 'वरिष्ठ जीवरसायनशास्त्रज्ञ' Senior Biochemist या पदास रु. ५४००/- श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे.

वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी यांना यापूर्वीच श्रेणी वेतनामध्ये वाढ करण्यात आली असल्याने पुन्हा रु. ५४००/- अशी श्रेणीवाढ करण्यात आली नाही.

## (24) प्रमुख रुग्णालये – ग्रंथपाल

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख वैदयकीय ग्रंथपाल | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4800 |
| २ | वरिष्ठ ग्रंथपाल | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4400 |
| ३ | कनिष्ठ ग्रंथपाल | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय –**

महाराष्ट्र शासनाने दि.१२.१०.२०२२ नुसार राज्यामधील वैद्यकीय महाविदयालयातील ग्रंथपालांच्या वेतनश्रेणीमध्ये केलेली सुधारणा तसेच त्यांना लागू करण्यात आलेला विद्यापीठ अनुदान आयोग लक्षात घेता, फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैदयकीय महाविदयालयाशी संलग्न असलेल्या ग्रंथालयात कार्यरत असलेल्या 'ग्रंथपाल' संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (25) प्रमुख रुग्णालये – संजीवन शास्त्रज्ञ (Perfusionist)

**अभिप्राय -**

वेतन विसंगती समिती २०१२ ने 'संजीवन शास्त्रज्ञ' म्हणून कार्यरत असलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे पदनाम बदलून 'संजीवन शास्त्रज्ञ' करण्याची शिफारस केली होती. तदनंतर प्रमुख रुग्णालयांच्या आवश्यकतेनुसार 'प्रयोगशाळा तंत्रज्ञ'या संवर्गातील ७ अनुसूचित पदे खंडीत करुन 'संजीवन शास्त्रज्ञ' या संवर्गातील ७ नवीन पदे निर्माण करण्यासाठी संचालक (वै.शि.व प्र.रु.) यांनी प्रस्ताव सादर केला. सदर पद सध्या महानगरपालिकेच्या कोणत्याही आस्थापनेवर कार्यरत नाही. 'प्रयोगशाळा तंत्रज्ञ' या पदाच्या अर्हतेपेक्षा 'संजीवन शास्त्रज्ञ' या पदाच्या शैक्षणिक अर्हता भिन्न व अधिक आहेत. तसेच कामाचे स्वरुपही भिन्न आहे. राज्य शासनाकडे 'संजीवन शास्त्रज्ञ' हे पद अस्तित्वात आहे. यास्तव राज्य शासनाच्या धर्तीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये 'संजीवन शास्त्रज्ञ' ही पदे नव्याने निर्माण करावी लागतील. यास्तव सदर बाब विहित कार्यपध्दतीनुसार महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने पद निर्माण समिती समोर सादर करणे आवश्यक आहे.

## (26) प्रमुख रुग्णालये – आहारतज्ञ

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | आहारतज्ञ | 9300 – 34800 + GRP 4300 | 9300 – 34800 + GRP 4600 |
| २ | सहाय्यक आहारतज्ञ | 9300 – 34800 + GRP 4200 | 9300 – 34800 + GRP 4300 |

**अभिप्राय -**

राज्य शासनातील पदांशी महानगरपालिकेच्या आहारतज्ञांशी असलेली समकक्षता तसेच आहारतज्ञांची शैक्षणिक अर्हता लक्षात घेऊन 'आहारतज्ञ' संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये राज्य शासनाच्या धर्तीवर सुधारणा करण्यात आली आहे.

## (27) प्रमुख रुग्णालये –लोकमान्य टिळक महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय –नाभिक संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | मुख्य नाभिक | 5200 – 20200 + GRP 1900 | 5200 – 20200 + GRP 1950 |
| २ | नाभिक | 5200 – 20200 + GRP 1900 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

'मुख्य नाभिक' व 'नाभिक' या पदामधील वेतन विसंगती दूर करण्यासाठी श्रेणीवाढ करण्यात आली आहे.

## (28) जनसंपर्क विभाग- विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | जनसंपर्क अधिकारी | 15600 - 39100 + GRP 6000 | 15600 - 39100 + GRP 6300 |
| २ | उप जनसंपर्क अधिकारी | 9300 - 34800 + GRP 5400 | 15600 - 39100 + GRP 5400 |
| ३ | सहाय्यक जनसंपर्क अधिकारी | 9300 - 34800 + GRP 4400 | 9300 - 34800 + GRP 4800 |

**अभिप्राय–**

खातेप्रमुख म्हणून असलेल्या जबाबदा-या व कर्तव्ये लक्षात घेता जनसंपर्क अधिकारी या पदाच्या श्रेणीवेतनामध्ये तसेच सदर विभागातील विविध संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (29) राजशिष्टाचार व संपर्क विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख राजशिष्टाचार अधिकारी | सद्य परिस्थितीत सदर पद अस्तित्वात नाही. | पद पुनर्जिवित केल्यानंतर देय होणारी वेतनश्रेणी – 15600–39100 + GRP 6300 |
| २ | राजशिष्टाचार अधिकारी | 9300–34800 + GRP 4800 | 15600 - 39100 + GRP 5400 |
| ३ | सहाय्यक राजशिष्टाचार अधिकारी | 9300–34800 + GRP 4400 | 9300–34800 + GRP 4800 |
| ४ | राजशिष्टाचार सहाय्यक | 5200–20200 + GRP 2000 | 5200–20200 + GRP 2800 |

**अभिप्राय -**

'प्रमुख राजशिष्टाचार अधिकारी' हे पद पुनर्जिवित करुन 'राजशिष्टाचार अधिकारी' या पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-यास 'प्रमुख राजशिष्टाचार अधिकारी' या पदावर पदोन्नती देऊन खाते प्रमुखाचा दर्जा देण्यात यावा.

तसेच मा.गिरीराज समितीच्या शिफारशीमध्ये अंशत: बदल करुन राजशिष्टाचार व संपर्क अधिकारी या कक्षात राज शिष्टाचार सहाय्यक – ५ पदे, सहाय्यक राजशिष्टाचार अधिकारी– ४ पदे, राजशिष्टाचार अधिकारी- १ पद व प्रमुख राजशिष्टाचार अधिकारी-१ पद अशा पदशृंखलेची शिफारस करण्यात आली आहे.

## (30) वसाहत खाते – वरिष्ठ वसाहत अधिकारी

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ वसाहत अधिकारी | 9300–34800 + GRP 4600 | 9300–34800 + GRP 5100 |

**अभिप्राय –**

'वरिष्ठ वसाहत अधिकारी' ही पदे प्रशासकीय अधिकारी संवर्गातून भरण्यात येत असल्याने सदर बाब विचारात घेऊन यापूर्वी 'वरिष्ठ वसाहत अधिकारी' या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (31) दुकाने व आस्थापना विभाग – विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख निरिक्षक (दुकाने व आस्थापना) | 9300-34800 + GRP 5400 | 15600-39100 + GRP 6600 |
| २ | उप प्रमुख सुविधाकार /उपप्रमुख निरिक्षक (दुकाने व आस्थापना) | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5400 |
| ३ | वरिष्ठ सुविधाकार/व. निरिक्षक (दुकाने व आस्थापना) | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4400 |
| ४ | सुविधाकार / निरिक्षक (दुकाने व आस्थापना) | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सध्याचे कामाचे स्वरुप, कर्तव्य व जबाबदा-या लक्षात घेऊन सदर संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (32) दुकाने व आस्थापना विभाग – दुकान परिचर

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ दुकान परिचर | 5200 – 20200 + GRP 1900 | 5200 – 20200 + GRP 2000 |
| २ | दुकान परिचर | 5200 – 20200 + GRP 1850 | 5200 – 20200 + GRP 1900 |

**अभिप्राय –**

कामाचे सारखे स्वरुप लक्षात घेऊन तसेच एसएससी उत्तीर्ण / एसएससी अनुत्तीर्ण या बाबतीत समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्रेणीवेतनात बदल करण्यात आला आहे.

## (33) महापालिका चिटणीस विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक महापालिका चिटणीस (वरिष्ठ) | 9300-34800 + GRP 4600 | 9300-34800 + GRP 4800 |
| २ | सहाय्यक महापालिका चिटणीस (वरिष्ठ) मराठी | | |
| ३ | सहाय्यक महापालिका चिटणीस (कनिष्ठ) | 9300-34800 + GRP 4400 | 9300-34800 + GRP 4600 |
| ४ | सहाय्यक महापालिका चिटणीस (कनिष्ठ) मराठी | | |
| ५ | वरिष्ठ चिटणविशी सहाय्यक | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4400 |
| ६ | वरिष्ठ चिटणविशी सहाय्यक (मराठी) | | |
| ७ | कनिष्ठ चिटणविशी सहाय्यक | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |
| ८ | कनिष्ठ चिटणविशी सहाय्यक (मराठी) | | |
| ९ | लिपिक | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 |

**अभिप्राय –**

वेतन विसंगती समिती २०१४ ने वाढीव श्रेणीवेतनाची शिफारस यापूर्वीच केली असल्याने वेतन विसंगती समिती २०१९ ने काही बदल केला नाही. तथापि, इतर विभागामधील 'लिपिक' संवर्गातील पदांच्या श्रेणीवेतनामध्ये केलेली वाढ लक्षात घेता, या विभागामधील त्यांना समकक्ष असलेल्या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (34) सामान्य प्रशासन विभाग – सहाय्यक आयुक्त

**अभिप्राय –**

सहाय्यक आयुक्त पदास नियुक्तीच्या वेळेस PB3 - 15600-39100 + श्रेणी वेतन 7600 देऊन, 20% पदधारकांना 10 वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर निवड वेतनश्रेणी PB3 – 15600-39100 + श्रेणी वेतन 7900 देण्यात येत आहे.

निवडश्रेणी देताना दोन अतिरिक्त वेतनवाढी देण्याची मागणी करण्यात आली होती. तथापि, निवडश्रेणीसाठी अतिरिक्त वेतनवाढ देणे संयुक्तिक ठरत नाही.

## (35) सामान्य प्रशासन विभाग - महापालिका उप आयुक्त

**अभिप्राय –**

(i) सामान्य प्रशासन विभागातील उप आयुक्त संवर्ग पदास PB4 - 37400-67000 + श्रेणी वेतन 8900 ही वेतनश्रेणी देण्यात यावी.

(ii) मा.गिरीराज वेतन विसंगती समिती-२०१९ च्या शिफारशीमध्ये अंशत: बदल करुन, 'उप आयुक्त' संवर्गातील ३३% पदांना पाच वर्षे सेवेनंतर 'सह आयुक्त' पदनाम व PB-4 37400–67000 + GRP 9400 ही निवडश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच निवडश्रेणी लागू करताना एक विशेष बाब म्हणून दोन अतिरिक्त वेतनवाढी देण्यात याव्यात.

सह आयुक्त संवर्गाचे सातव्या वेतन आयोगानुसारचे Pay Matrix परिपत्रकाच्या शेवटी जोडण्यात आले आहे.

## (36) नियोजन विभाग - समाज विकास अधिकारी

**अभिप्राय –**

समाज विकास अधिकारी या संवर्गाबाबत वेतन विसंगती समिती २०१९ ने अभ्यासपूर्ण शिफारस केली असल्याने पुन्हा श्रेणी वेतनामध्ये वाढ करण्यात आली नाही. श्री.राजश्री वाणी, श्री. माळवी व श्री. साळवी हे आरोग्य खात्यात समाज विकास अधिकारी म्हणून काम करीत असून त्यांना वाढीव श्रेणीवेतन रु. ४३०० चा लाभ मिळत नाही.

समाज विकास अधिकारी या संवर्गाची जी पदे इतरत्र कार्यरत आहेत अशी सर्व पदे नियोजन विभागाच्या अखत्यारित आणली गेली नसल्याने त्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नाहीत. यास्तव सदर पदे नियोजन विभागाच्या अखत्यारित आणणे आवश्यक आहे. तसेच श्रीम. वाणी, श्री. माळवी व श्री. साळवी यांना वेतन विसंगती समिती २०१९ ने शिफारस केलेले श्रेणीवेतन रु. ४३०० लागू करण्यास समितीने शिफारस केली आहे. याबाबत खात्याने उचित कार्यवाही करावी.

## (37) करनिर्धारण व संकलन विभाग - श्री संभाजी प्रकाश टेकवडे, रोखपाल

**अभिप्राय –**

मा. गिरीराज समितीने मुख्य लिपिकाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या रोखपालांना रु. ४२०० श्रेणीवेतन देण्याची शिफारस केल्याप्रमाणे, श्रीमती शैला गणेश नाईक यांनी मुख्य लिपिकाची खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण केली असल्याने त्यांना मुख्य लिपिक पदासाठी अनुज्ञेय असलेले श्रेणीवेतन रु. ४२०० अनुज्ञेय करण्यात आले आहे.

मा.गिरीराज समितीच्या शिफारशीत नमूद केल्यानुसार, श्री.टेकवडे यांनी मुख्य लिपिक पदाची परीक्षा उत्तीर्ण केलेली नाही. त्यांची 'रोख प्रापक लिपिक' या पदावर नियुक्ती झाली असून त्यांना 'रोखपाल' या पदाची कालबध्द पदोन्नती दि.११.०४.२०१० पासून देय करण्यात आली. तदनंतर श्री.टेकवडे यांना दि.०१.११.२०१२ रोजी रोखपाल पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली.

श्री.टेकवडे 'रोख प्रापक लिपिक' या पदावर दिर्घ कालावधीसाठी कार्यरत होते. तथापि, रोखपाल या पदावर ते १० वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी कार्यरत होते, हा दिर्घ कालावधी होत नाही. तसेच त्यांनी मुख्य लिपिक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली नाही. त्यामुळे त्यांना रु.४२०० श्रेणीवेतन देण्याची मागणी अमान्य करण्यात आली आहे.

## (38) करनिर्धारण व संकलन विभाग– विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | करनिर्धारक व संकलक | 15600-39100 + GRP 7600 | बदल नाही. |
| २ | उप करनिर्धारक व संकलक | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| ३ | सहाय्यक करनिर्धारक व संकलक / सहाय्यक निवडणूक नगर शुल्क अधिकारी | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5400 |
| ४ | अधिक्षक (क. व सं.)/ वरिष्ठ पर्यवेक्षी निरिक्षक / जप्ती अधिकारी | 9300-34800 + GRP 4600 | 9300-34800 + GRP 4800 |
| ५ | उप अधिक्षक (क. व सं.) | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4400 |
| ६ | विभाग निरिक्षक | 5200-20200 + GRP 2800 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

सदर खात्यामधील खातेप्रमुख व उप करनिर्धारक व संकलक या पदांच्या श्रेणी वेतनामध्ये बदल करण्यात आलेला नाही. तथापि उप करनिर्धारक व संकलक व विभाग कार्यालयात काम करणारे सहाय्यक करनिर्धारक व संकलक व अधिक्षक (क. व सं.) यांच्या श्रेणीवेतनामध्ये खूप अंतर / तफावत आढळत असल्याने श्रेणी वेतनात सुधारणा करण्यात आली आहे.

## (39) सुरक्षा विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख सुरक्षा अधिकारी | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही |
| २ | उप प्रमुख सुरक्षा अधिकारी | 9300-34800 + GRP 5400 | बदल नाही |
| ३ | विभागीय सुरक्षा अधिकारी | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5100 |
| ४ | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4300 |
| ५ | सुरक्षा जमादार | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2800 |
| ६ | मुख्य सुरक्षा रक्षक | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2400 |
| ७ | सुरक्षा रक्षक | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 |
| ८ | सुरक्षा रक्षक (हत्यारबंद) | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 |

**अभिप्राय –**

'सुरक्षा रक्षक' या संवर्गातील पदधारकांची कर्तव्ये, जबाबदा-या व कामाचे स्वरुप लक्षात घेऊन श्रेणी वेतनात वाढ करण्यात आली आहे. उर्वरित पदांच्या श्रेणीवेतनामध्ये बदल करण्यासाठी योग्य ते समर्थन निदर्शनास न आल्याने त्यात बदल करण्यात आलेला नाही.

## (40) जल अभियंता विभाग – बिनतारी पर्यवेक्षक

**अभिप्राय –**

सद्यस्थितीत या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या यामध्ये कालानुरुप बदल झाले आहेत. असलेले श्रेणीवेतन सुयोग्य आहे. यास्तव यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## (41) जल अभियंता विभाग– पिसे पांजरापूर, भांडूप संकुल, दादर (मलजल) येथील प्रयोगशाळा

**अभिप्राय –**

वेतन विसंगती समिती २०१२ ने याबाबत यापूर्वीच वाढीची शिफारस केली आहे. त्यामुळे अतिरिक्त वाढ मंजूर करण्यात आलेली नाही.

## (42) नगर अभियंता विभाग - आरेखक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | आरेखक | 5200-20200 + GRP 2800<br>After 4 years qualifying service<br>9300-34800 + GRP 4300 | 5200-20200 + GRP 2800<br>As Pay Anomaly Committee 2012, categorically declared Head Draftsman post as dying cadre, the condition of 4 years qualifying service in the post of Draftsman stands deleted. Therefore, Draftsman drawing GRP Rs.2800/- will be entitled to time-bound promotion after requisite time period in the grade of –<br>9300-34800 + GRP 4300 |
| २ | अनुरेखक | 5200-20200 + GRP 2000<br>After 7 years qualifying service<br>5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2000<br>After 7 years qualifying service<br>5200-20200 + GRP 2400<br>हा पहिला लाभ गणण्यात येऊ नये. |

**अभिप्राय –**

राज्य शासनाच्या धर्तीवर अनुरेखक - आरेखक – मुख्य आरेखक या पदांना श्रेणीवाढीची योजना लागू करण्यात आली. तथापि बृहन्मंबई महानगरपालिकेत मात्र श्रेणी वाढीसाठी असणारी अर्हताकारी परिक्षा होऊ न शकल्याने सदर योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये लागू होऊ शकली नाही. वेतन विसंगती समिती २०१९ ने परीक्षेची अट रद्द केली आहे.

कालबध्द पदोन्नती देताना सदर अर्हतेमधील श्रेणी वाढीसाठी असणारी अर्हताकारी परिक्षेची अट रद्द करुन त्यांना दि. ७.७.२००५ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ देय करण्यात यावा.

## (43) नगर अभियंता विभाग – ओव्हरसिअर (NQO)

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नगर अभियंता विभागात कार्यरत असलेले ओव्हरसिअर (NQO) हे पदधारक कनिष्ठ अभियंता पदाची कर्तव्य व जबाबदा-या पार पाडत असल्याने त्यांना कनिष्ठ अभियंता पदाइतकी वेतनश्रेणी व श्रेणीवेतन देण्याची मागणी करण्यात आली. कनिष्ठ अभियंता हे अभियांत्रिकी पदविकाधारक आहेत. यांची पदविका लक्षात घेता दिर्घ अनुभव असलेल्या विजतंत्री बरोबर त्यांची तुलना करता येणार नाही. यास्तव सदर मागणी मान्य करण्यात आली नाही.

## (44) अभियांत्रिकी विभाग- विविध संवर्ग

वेतन विसंगती सुधारणा समिती २०२२ ने अभियंता संवर्गाबाबत दिलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.2)/आरजीसेल/10 दि.08.09.2023 निर्गमित करण्यात आले असून, सदर परिपत्रकामध्ये नमूद केलेली सहाय्यक अभियंता संवर्गाची सहावा वेतन आयोगानुसारची विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणी वेतन PB3, 15600-39100 + GRP 5400 ऐवजी PB2, 9300-34800 + GRP 5400 अशी वाचण्यात यावी.

## (45) अभियांत्रिकी विभाग – वास्तुशास्त्रज्ञ

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतन श्रेणी व श्रेणी वेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतन श्रेणी व श्रेणी वेतन |
|---|---|---|---|
| १ | महापालिका वास्तुशास्त्रज्ञ (प्रस्तावीत – प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ) | 15600-39100 +GRP 7100 | प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ 37400-67000 + GRP 8700 |
| २ | महापालिका उप वास्तुशास्त्रज्ञ (प्रस्तावीत – उप प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ) | 15600-39100+ GRP 6000 | उप प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ 15600-39100 + GRP 7600 |
| ३ | वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | 9300-34800 + GRP 5400 | वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ 15600-39100+ GRP 6600 |
| ४ | दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ) (प्रस्तावीत- वास्तुशास्त्रज्ञ) | 9300-34800 +GRP 4600 | (वास्तुशास्त्रज्ञ) 15600-39100+ GRP 5400 |

**अभिप्राय –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञांचे मूळ वेतन संरक्षित करण्याच्या दृष्टिकोनातून सदर वास्तुशास्त्रज्ञांना दि.३१.०३.२००५ रोजी देण्यात आलेल्या मूळ वेतनास दि.०१.०४.२००५ ते दि.३१.१२.२००५ या कालावधीत देय असलेल्या नियत वार्षिक वेतनवाढीच्या लाभासह पुढील ९ महिन्यांच्या कालावधीकरिता म्हणजेच दि.३१.१२.२००५ पर्यंत मुदतवाढ द्यावी व त्यानुसार परिगणित केलेल्या डिसेंबर २००५ च्या मूळ वेतनावर सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी दि.०१.०१.२००६ पासून लागू कराव्यात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्येची व बांधकामाची घनता लक्षात घेता व वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणाच्या अनुषंगाने पायाभूत व इतर सुविधा पुरविण्याचे कार्य लक्षात घेता, मुंबई महानगरपालिकेचा कार्यभार उर्वरित महाराष्ट्राच्या कार्याभाराच्या समतुल्य आहे. सदर बाबींचा विचार करून महापालिका वास्तुशास्त्रज्ञ संवर्गाला सुधारीत वेतनश्रेणी व श्रेणी वेतन लागू करण्यात आले आहे.

१) वेतन विसंगती समिती-2019 ने सुचविल्याप्रमाणे, दुय्यम अभियंता (वास्तुशास्त्रज्ञ)' या पदाचे नामाभिधान 'वास्तुशास्त्रज्ञ' असे बदलण्यात यावे. या समितीने 'महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ' या पदाचे नामाभिधान 'प्रमुख वास्तुशास्त्रज्ञ' असे बदलण्याची शिफारस केली आहे.

२) 'वास्तुशास्त्रज्ञ' हा संवर्ग तांत्रिक संवर्ग असला तरी त्यास पदोन्नतीच्या मर्यादित संधी उपलब्ध आहेत. इतर तांत्रिक संवर्गामध्ये सुद्धा सर्वोच्च पदाच्या पदोन्नतीच्या संधी असणे आवश्यक आहे. यास्तव वास्तुशास्त्रज्ञ या संवर्गातील सर्वोच्च पद म्हणजे 'महापालिका वास्तुशास्त्रज्ञ' या पदाचा उप आयुक्त (अभियांत्रिकी) या पदाच्या पदोन्नतीसाठी विचार करण्यात यावा. अशी समितीने शिफारस केली आहे.

३) 'वास्तुशास्त्रज्ञ' हा वेगळा व स्वतंत्र संवर्ग म्हणून ग्राह्य धरला जात नाही. यास्तव 'वास्तुशास्त्रज्ञ' हा स्वतंत्र संवर्ग म्हणून गणला जावा.

## (46) अनुज्ञापन विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | अनुज्ञापन अधिक्षक | 15600– 39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| २ | सह अनुज्ञापन अधिक्षक | 9300 – 34800 + GRP 4600 | 15600– 39100 + GRP 6000 |
| ३ | उप अनुज्ञापन अधिक्षक | 9300 – 34800 + GRP 4500 | 9300 – 34800 + GRP 5400 |
| ४ | सहाय्यक अनुज्ञापन अधिक्षक | 9300 – 34800 + GRP 4400 | 9300 – 34800 + GRP 4800 |
| ५ | वरिष्ठ निरिक्षक (अनुज्ञापन) | 9300 – 34800 + GRP 4300 | 9300 – 34800 + GRP 4400 |
| ६ | अनुज्ञापन निरिक्षक | 5200–20200 + GRP 2800 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये सदर खात्याचा मोठा सहभाग आहे. शासनाकडील पदांचे कामकाज व इतर बाबी तसेच मुंबई शहराची लोकसंख्या व तेथील आस्थापनांची संख्या लक्षात घेऊन वरिष्ठ निरिक्षक (अनुज्ञापन), सहाय्यक अनुज्ञापन अधिक्षक, उप अनुज्ञापन अधिक्षक व सह अनुज्ञापन अधिक्षक या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (47) महापालिका मुख्य लेखा परिक्षक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | महापालिका मुख्य लेखा परिक्षक | राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. | |
| २ | सह मुख्य लेखा परिक्षक | 15600– 39100 + GRP 6800 | बदल नाही. |
| ३ | उप मुख्य लेखा परिक्षक | 15600– 39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| ४ | लेखा परीक्षा अधिकारी | 9300 – 34800 + GRP 4800 | 9300 – 34800 + GRP 5100 |
| ५ | वरिष्ठ लेखा परीक्षा सहाय्यक | 9300 – 34800 + GRP 4200 | 9300 – 34800 + GRP 4400 |
| ६ | कनिष्ठ लेखा परीक्षा सहाय्यक | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय –**

सह मुख्य लेखा परिक्षक व उप मुख्य लेखा परिक्षक या संवर्गाबाबत वेतन विसंगती समिती २०१९ ने अभ्यासपूर्ण शिफारस केली असल्याने पुन्हा शिफारस करण्यात आली नाही.

## (48) महानगरपालिका मुद्रणालय – विविध संवर्ग

मुद्रणालय विभागाकडून त्यांच्या संरचनेमध्ये सद्य परिस्थितीत काही बदल सुचविण्यात आले. या संरचनेमध्ये काही संवर्ग एका संवर्गामध्ये घेऊन या संवर्गाला नवीन पदनाम देण्याबाबत प्रस्ताविले होते. मुद्रणालय विभागाच्या मते अशा प्रकारच्या विविध संवर्गांना एकाच संवर्गात घेतल्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजामध्ये सुलभता येईल. मुद्रणालय विभागाने त्याप्रमाणे सध्याच्या कार्यभाराप्रमाणे (Workload) काही संवर्गातील पदे कमी करणे तसेच काही संवर्गच पूर्णपणे कमी करणे याबाबतही प्रस्ताविले होते.

उपरोक्तच्या अनुषंगाने एक विशेष बाब म्हणून त्यांची नवीन संरचना मान्य करुन त्याची शिफारस केली आहे. परंतु यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे बदलत्या तंत्रज्ञानाचा फायदा घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात केलेल्या व्यक्तींची नेमणूक व त्या अनुषंगाने आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे अनिवार्य असल्याने मुद्रणालय विभागाचे रि-इंजिनियरिंग करण्याची शिफारस केली आहे.

सध्या महानगरपालिका मुद्रणालयात व प्रतिरुप मुद्रण विभागात ८ तांत्रिक विभाग, १ अधिकारी विभाग व १ कार्यालयीन विभाग अशा एकूण १० विभागात मिळून आस्थापना अनुसूचिवर ३२६ पदे कार्यरत आहेत. या ३२६ पदांमध्ये ३५ चतुर्थ श्रेणी मधील संवर्ग आहेत. सदर संवर्ग कमी करुन बदलत्या कामानुसार संवर्गाचे एकत्रिकरण प्रस्ताविण्यात आले आहे.

### 1) महानगरपालिका मुद्रणालयातील अधिकारी संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | 15600-39100 + GRP 5400 | 15600-39100 + GRP 6000 |
| २ | उपव्यवस्थापक | 9300-34800 + GRP 5100 | 9300-34800 + GRP 5400 |
| ३ | अधिक्षक | 9300-34800 + GRP 5100 | 9300-34800 + GRP 5400 |
| ४ | सहाय्यक व्यवस्थापक | 9300-34800 + GRP 4200<br>9300-34800 + GRP 4600 | 9300-34800 + GRP 4600 |

## 2) महानगरपालिका मुद्रणालयातील डिटीपी विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डिटीपी पर्यवेक्षक | 1 | 1 | 0 | **1** | **0** | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 | डिटीपी पर्यवेक्षक |
| २ | छायाचित्र मुद्राक्षर मांडणी यंत्रचालक | 9 | 3 | 6 | **6** | **3** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | डिटीपी ऑपरेटर |
| | एकूण | **10** | **4** | **6** | **7** | **3** | | | |

## 3) महानगरपालिका मुद्रणालयातील मुद्रण विभाग

| अ. क्र. | विद्यमान पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुद्रण पर्यवेक्षक | 2 | 2 | 0 | 2 | 0 | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण पर्यवेक्षक |
| २ | व्दिरंगी प्रतिरूप मुद्रण पध्दती यंत्रचालक | 2 | 1 | 1 | 2 | 0 | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 1 |
| ३ | यंत्रचालक सहाय्यक (रँक झेरॉक्स) (रिसोग्राफ यंत्रचालक) | 2 | 0 | 2 | 2 | 0 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 1 |

| अ. क्र. | विद्यमान पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | एकरंगी प्रतिरूप मुद्रण यंत्रचालक | 11 | 5 | 6 | 8 | 3 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 1 |
| ५ | हस्तमुद्रक सहाय्यक यंत्रचालक) | 2 | 0 | 2 | 0 | 2 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 1 |
| ६ | हस्तमुद्रक वरिष्ठ (स्वंचलित यंत्रे) | 16 | 8 | 8 | 9 | 7 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 2 |
| ७ | कनिष्ठ हस्तमुद्रक | 7 | 7 | 0 | 7 | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 2 |
| ८ | यंत्रचालक सहाय्यक (दुरंगी प्रतिरूप मुद्रण पध्दती) | 4 | 4 | 0 | 4 | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 2 |
| ९ | यंत्रचालक सहाय्यक (एकरंगी प्रतिरूप मुद्रण पध्दती) | 11 | 7 | 4 | 11 | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 | मुद्रण यंत्रचालक सहाय्यक |
| १० | यंत्रचालक सहाय्यक | 21 | 1 | 20 | 15 | 6 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 | |
| | एकूण | 78 | 35 | 43 | 60 | 18 | | | |

## 4) महानगरपालिका मुद्रणालयातील बांधणी विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य बांधणीकार | 7 | 6 | 1 | **6** | 1 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | बांधणी पर्यवेक्षक |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | प्रकर्तन यंत्रचालक | 13 | 13 | 0 | **13** | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2400 | बांधणी यंत्रचालक |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | वरिष्ठ बांधणीकार (मिनाबिंडा) | 4 | 4 | 0 | **4** | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2400 | बांधणी यंत्रचालक |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | वरिष्ठ बांधणीकार (वायरस्टीचिंग) | 6 | 6 | 0 | **6** | 0 | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2400 | बांधणी यंत्रचालक |
| | ↑ | | | | | | | | |
| 5 | वरिष्ठ बांधणीकार | 48 | 17 | 31 | **34** | **14** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | बांधणीकार |
| | ↑ | | | | | | | | |
| 6 | कनिष्ठ बांधणीकार | 35 | 10 | 25 | **10** | **25** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | बांधणीकार |
| | ↑ | | | | | | | | |
| 7 | बांधणी यंत्रचालक सहाय्यक | 22 | 1 | 21 | **22** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | बांधणी सहाय्यक |
| | ↑ | | | | | | | | |
| 8 | सरस लावणारे | 21 | 1 | 20 | **18** | **3** | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 | बांधणी सहाय्यक (सरस) |
| | **एकूण** | 156 | 58 | 98 | **113** | **43** | | | |

## 5) महानगरपालिका मुद्रणालयातील इतर विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पेस्ट मुद्रण पट्टा बनवणारा | 2 | 1 | 1 | **1** | **1** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | वरिष्ठ अन्वयोजक | सदर संवर्ग कालबाह्य असल्यामुळे पदे आस्थापना अनुसूचीवरून कमी करण्यात आलेली आहेत. | | | | | | | |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | कनिष्ठ अन्वयोजक | 1 | 1 | 0 | **1** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | सर्वसाधारण सहाय्यक | सदर संवर्ग कालबाह्य असल्यामुळे पदे आस्थापना अनुसूचीवरून कमी करण्यात आलेली आहेत. | | | | | | | |

**अभिप्राय** - सदर विभागाचे कामकाज कालबाह्य झाले असल्यामुळे नमूद पदनामांमधील पेस्ट मुद्रण पट्टा बनवणारा व कनिष्ठ अन्वयोजक पदांवरील कार्यरत कर्मचारी अनुक्रमे दिनांक 01/02/2024 व दिनांक 01/09/2026 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर आस्थापना अनुसूचीवरुन सदर पदे कमी करण्यात यावीत.

## 6) महानगरपालिका मुद्रणालयातील इतर विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रतिरुप मुद्रण अभिलेख भांडारपाल | 2 | 1 | 1 | **2** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | भांडारपाल |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | धातू भांडारपाल | 1 | 0 | 1 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | सहाय्यक धातू भांडारपाल | 1 | 0 | 1 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | भांडार परिचर | 8 | 5 | 3 | **8** | **0** | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2000 | सहाय्यक भांडारपाल |
| | **एकूण** | **12** | **6** | **9** | **10** | **2** | | | |

## 7) महानगरपालिका मुद्रणालयातील इतर विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | धातू भट्टी परिचर | 1 | 0 | 1 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| 2 | सर्वसाधारण यांत्रिक | 2 | 0 | 2 | **2** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| 3 | बटवडा परिचर | 1 | 0 | 1 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| 4 | मोनोकास्टर | 1 | 1 | 0 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | **एकूण** | **5** | **1** | **4** | **2** | **3** | | | |

**अभिप्राय -** सदर विभागाचे कामकाज कालबाह्य झाले असल्यामुळे नमूद पदनामांमधील मोनोकास्टर पदांवरील कार्यरत कर्मचारी दिनांक 01/07/2025 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर आस्थापना अनुसूचीवरुन सदर पदे कमी करण्यात यावी.

## 8) महानगरपालिका मुद्रणालयातील जुळारी विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्लेटमेकर | 2 | 0 | 2 | **0** | **2** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | वरिष्ठ जुळारी | सदर सवंर्ग कालबाह्य झाला असल्यामुळे पदे आस्थापना अनुसूचीवरुन कमी करण्यात आलेली आहेत. | | | | | | | |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | कनिष्ठ जुळारी | 6 | 3 | 3 | **3** | **3** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | वितरक | 1 | 0 | 1 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 5 | मुद्रीतक सहाय्यक कामगार (गॅलीमन) | 1 | 1 | 0 | **0** | **1** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | - |
| | **एकूण** | **10** | **4** | **6** | **3** | **7** | | | |

**अभिप्राय -** सदर विभागाचे कामकाज कालबाह्य झाले असल्यामुळे नमूद पदनामांमधील कनिष्ठ जुळारी व मुद्रीतक सहाय्यक कामगार (गॅलीमन) पदांवरील कार्यरत कर्मचारी अनुक्रमे दिनांक 01/02/2024 व दिनांक 01/02/2026 व दिनांक 01/03/2026 तसेच 01/08/2024 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सदर कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर आस्थापना अनुसूचीवरुन सदर पदे कमी करण्यात यावी.

## 9) महानगरपालिका मुद्रणालयातील कार्यालयीन विभाग

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रगती तपासणीस | 4 | 2 | 2 | 4 | 0 | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 | - |

## 10) प्रतिरुप मुद्रण विभाग (पूर्व मुद्रण विभाग) (रोटा)

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुद्रीत शोधक (रोटा) | 2 | 0 | 2 | 2 | 0 | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | - |

## 11) प्रतिरुप मुद्रण विभाग (रोटा)

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य हस्तमुद्रक (रोटा) | 1 | 0 | 1 | **1** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | मुद्रण पर्यवेक्षक |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | रिसोग्राफ यंत्रचालक (रोटा) | 1 | 0 | 1 | **1** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 1 |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | वरिष्ठ यंत्रचालक (रोटा) | 5 | 2 | 3 | **5** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 | मुद्रण यंत्रचालक श्रेणी 2 |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | यंत्रचालक सहाय्यक | 6 | 1 | 5 | **6** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 | मुद्रण यंत्रचालक सहाय्यक |
| | ↑ | | | | | | | | |
| 5 | हमाल | 2 | 1 | 1 | **2** | **0** | 5200-20200 + GRP 1800 | बदल नाही | - |
| | **एकूण** | **15** | **4** | **11** | **15** | **0** | | | |

## 12) प्रतिरुप मुद्रण विभाग (बांधणी विभाग) (रोटा)

| अ. क्र. | पदनाम | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | आवश्यक पदांची संख्या | आस्थापना अनुसूचीवरून कमी करावयाची प्रस्तावित पदांची संख्या | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | प्रस्तावित पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बांधणी प्रमुख (रोटा) | 1 | 1 | 0 | **1** | **0** | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 | बांधणी पर्यवेक्षक |
| | ↑ | | | | | | | | |
| 2 | प्रकर्तन यंत्रचालक (रोटा) | 2 | 0 | 2 | **2** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | बांधणी यंत्रचालक |
| | ↑ | | | | | | | | |
| 3 | वरिष्ठ बांधणीकार (रोटा) | 3 | 1 | 2 | **3** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 | बांधणीकार |
| | ↑ | | | | | | | | |
| 4 | कनिष्ठ बांधणीकार (रोटा) | 8 | 2 | 5 | **8** | **0** | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 | - |
| | ↑ | | | | | | | | |
| 5 | हमाल | 2 | 1 | 1 | **2** | **0** | 5200-20200 + GRP 1800 | बदल नाही | - |
| | **एकूण** | **16** | **5** | **10** | **16** | **0** | | | |

**अभिप्राय:-**

सदर वर्गीकरण कामगारांच्या बदलत्या कामानुसार करण्यात आले आहे.

वर्गीकरण करत असताना शक्यतो एकच श्रेणी व श्रेणी वेतन असलेली पदे एकत्र करुन एक नवीन पदनाम देण्यात आले आहे.

नवीन संरचना अंमलात आणत असताना एकूण ३२६ पदांमधून ७० पदे आस्थापना अनुसूचिवरुन कमी करण्याची शिफारस करण्यात आली आहे, जेणेकरुन आस्थापना खर्चात कपात होईल.

नवीन संरचना अंमलात आणल्यानंतर तात्काळ विविध पदांच्या विद्यमान अहर्तांमध्ये बदल करुन नवीन प्रस्तावित पदांची सुधारित पदनामे / अर्हता / कर्तव्यसूची मंजूर कराव्या लागतील.

बदलत्या संरचना अंमलात आणत असताना कर्मचा-याचे आर्थिक नुकसान होत असल्यास, जुन्या रचनेनुसार दिले गेलेले फायदे काढून घेण्यात येऊ नयेत.

**(49) महानगरपालिका मुद्रणालय – श्री. योगेश दामु साळुंके व श्री. नंदकुमार गणपत कोटकर, सहाय्यक व्यवस्थापक**

विसंगती समिती २०१२ च्या शिफारशीनुसार कनिष्ठ उत्पादन अधिकारी व वरिष्ठ उत्पादन अधिकारी ही पदे एकत्रित करुन त्यांना सहाय्यक व्यवस्थापक असे पदनाम देण्यात आले व पदवीधारकांना रु. ४६०० श्रेणीवेतन व पदविकाधारकांना रु. ४२०० श्रेणीवेतन व पाच वर्षांनंतर रु. ४६०० श्रेणीवेतन देय करण्यात आले.

मा. गिरीराज समितीने सन २००९ मध्ये भरती झालेल्या पदविकाधारकांना सुध्दा रु.४६०० श्रेणीवेतन अनुज्ञेय केले. त्याच धर्तीवर 'समान काम-समान वेतन' तत्वानुसार सन २०१३ व २०१४ मध्ये भरती झालेल्या पदविकाधारकांना रु.४६०० श्रेणीवेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

**(50) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) – प्रशितन विभाग (Refrigeration Deptt.)**

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | पर्यवेक्षक | 9300-34800 + GRP 4200 | बदल नाही |
| २ | यांत्रिकी प्रशितन | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |
| ३ | प्रशितन यंत्रचालक | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2100 |
| ४ | प्रशितन सहाय्यक (सहाय्यक प्रशितन यंत्रचालक) | 5200-20200 + GRP 1900 | 5200-20200 + GRP 1950 |

**अभिप्राय –**

या विभागातील पदांच्या तांत्रिक अर्हता लक्षात घेऊन श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**(51) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांच्या अखत्यारीतील कार्यशाळा - विविध संवर्ग**

अन्य शिफारशी अंतर्गत अ.क्र. १३ मध्ये शिफारस केल्यानुसार ज्या वेतनश्रेणी संकेतांकांच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्या वेतनश्रेणी संकेतांकामध्ये असलेल्या संवर्गांच्या श्रेणीवेतनामध्ये बदल लागू होईल.

## (52) कामगार विभाग – Assistant Labour Welfare Officer

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख कामगार अधिकारी | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही |
| २ | सह प्रमुख कामगार अधिकारी | 9300-34800 + GRP 5400 | बदल नाही |
| ३ | विभागीय कामगार व समाज कल्याण अधिकारी | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4600 |
| ४ | सहाय्यक कामगार व समाज कल्याण अधिकारी | 5200-20200 + GRP 2800 | 9300-34800 + GRP 4200 |
| ५ | कल्याण निरीक्षक | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय**

सदर पदांच्या अर्हता, कर्तव्ये व जबाबदा-या इ. विचारात घेऊन समाज कल्याण निरिक्षक ते विभागीय कामगार व समाज कल्याण अधिकारी या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सदर विभागातील बरीच पदे रिक्त आहेत. यास्तव सदर विभागातील पदे त्वरीत भरण्यात यावी.

## (53) प्रमुख कामगार अधिकारी – दूरध्वनी चालक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | दूरध्वनी चालक 'अ' श्रेणी | 5200 – 20200 + GRP 2000 | 5200 – 20200 + GRP 2400 |
| २ | दूरध्वनी चालक 'ब' श्रेणी | 5200 – 20200 + GRP 1950 | 5200 – 20200 + GRP 2000 |

**अभिप्राय –**

दूरध्वनी चालक 'अ' श्रेणी मधील पदधारकांची कर्तव्यसूची, रुग्णालयात तसेच अग्निशमन विभागात रात्रपाळीमध्ये करावी लागणारे कामकाज लक्षात घेता दूरध्वनीचालक या संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. दूरध्वनी चालकास विशेष भत्ता वाढविणे बाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

## (54) सामान्य प्रशासन विभाग - लघुलेखक संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | स्वीय सहाय्यक | 9300-34800 + GRP 4600 | 9300-34800 + GRP 4800 |
| २ | वरिष्ठ लघुलेखक | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4400 |
| ३ | कनिष्ठ लघुलेखक | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेत इंग्रजी व मराठी या दोन्ही लघुलेखनाचे काम करावे लागते. सदर बाब लक्षात घेता या संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

स्वीय सहाय्यक संवर्गामधील पाच पदांना वरिष्ठ स्वीय सहाय्यक अशी दर्जोन्नती करुन पीबी-2 रु.9300-34800 + GRP 5400 अशी वेतनश्रेणी व श्रेणी वेतन देण्यात यावी.

## (55) बाजार विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक अधिक्षक (बाजार) | 9300 – 34800 + GRP 4400 | 9300 – 34800 + GRP 4600 |
| २ | मुख्य निरिक्षक (बाजार) | 5200 – 20200 + GRP 2800 | 9300 – 34800 + GRP 4200 |
| ३ | निरिक्षक (बाजार) | 5200 – 20200 + GRP 2100 | 5200 – 20200 + GRP 2400 |

**अभिप्राय –**

बाजार खात्यातील कार्यरत कर्मचा-यांची कर्तव्ये व जबाबदा-या लक्षात घेता श्रेणी वेतनात सुधारणा करण्यात आलेली आहे.

## (56) घनकचरा व्यवस्थापन विभाग – विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | मुख्य पर्यवेक्षक | 15600–39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| २ | उप मुख्य पर्यवेक्षक | 9300–34800 + GRP 4500 | 9300–34800 + GRP 5100 |
| ३ | सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक | 9300–34800+ GRP 4300 | 9300–34800+ GRP 4800 |
| ४ | पर्यवेक्षक | 9300–34800+ GRP 4200 | बदल नाही. |
| ५ | कनिष्ठ अवेक्षक | 5200–20200+ GRP 2400 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

मुंबई स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी हा संवर्ग पार पाडत असल्याने खातेप्रमुख व निम्न पदे यामधील श्रेणीवेतनामध्ये असलेले अंतर कमी करण्याकरीता सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक / उप मुख्य पर्यवेक्षक या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आली आहे.

**(57) घनकचरा व्यवस्थापन खाते अंतर्गत परिवहन विभागातील विविध संवर्ग -**

अन्य शिफारशी अंतर्गत अ.क्र.१३ मध्ये शिफारस केल्यानुसार एकाच वेतनश्रेणी व श्रेणीवेतनामध्ये बरेच संवर्ग आल्याने पदोन्नतीमध्ये निर्माण होणा-या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने ज्या वेतनश्रेणी संकेतांकाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्या वेतनश्रेणी संकेतांकामध्ये असलेल्या संवर्गांच्या श्रेणीवेतनामध्ये बदल लागू होईल.

**(58) प्रमुख कर्मचारी अधिकारी विभाग – विविध संवर्ग**

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख कर्मचारी अधिकारी | 15600–39100 + GRP 6600 | बदल नाही |
| २ | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी | 9300–34800 + GRP 5400 | 15600–39100+GRP 6000 |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | 9300–34800 + GRP 4600 | 9300–34800 + GRP 4800 |
| ४ | मुख्य लिपिक | 9300–34800 + GRP 4200 | 9300–34800 + GRP 4400 |
| ५ | वरिष्ठ लिपिक | 5200–20200 + GRP 2400 लिपिक संवर्गातील एकूण पदांच्या 40 टक्के पदांना | 5200–20200 + GRP 2800 लिपिक संवर्गातील एकूण पदांच्या 40 टक्के पदांना |
| ६ | लिपिक | 5200–20200 + GRP 2000 | 5200–20200 + GRP 2400 |

**अभिप्राय –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये लागू करण्यात आलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत अधिका-यांना कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय होत आहे. तथापि, पदोनत्तीच्या पदांची संख्या कमी असल्यामुळे कर्मचा-यास आर्थिक फायदा होत असला तरी प्रत्यक्ष पदावर ते काम करीत नाहीत.

कालबध्द पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांचा सुयोग्य वापर प्रशासनाच्या कामकाजासाठी होण्याच्या अनुषंगाने मुख्य लिपिक, प्रशासकीय अधिकारी व सहप्रमुख कर्मचारी यांच्या सध्याच्या पदांच्या संख्येत वाढ करुन, लिपिक पदांची संख्या कमी करणे याबाबत विचार करणे आवश्यक आहे.

सह प्रमुख कर्मचारी यांच्या सध्याच्या पदांमध्ये प्रशासकीय अधिकारी संवर्गातील पदांच्या २० टक्के एवढी वाढ करण्यात यावी. प्रशासनाने आवश्यकतेनुसार वरिष्ठ अधिका-यांच्या पदांमध्ये अधिक वाढ करण्याबाबत निर्णय घेणे योग्य ठरेल.

## (59) प्रमुख कर्मचारी अधिकारी -नोंदणी सहाय्यक

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अभिलेख अधिकारी | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4600 |
| २ | वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |
| ३ | वरिष्ठ नोंदणी सहाय्यक | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2100 |
| ४ | नोंदणी सहाय्यक | 5200-20200 + GRP 1950 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

- नोंदणी सहाय्यक ही पदे मृतवत न करता पुनर्जिवित करण्यात येत आहेत.
- प्रमुख कामगार अधिकारी यांच्यामार्फत या पदाची विद्यमान पध्दतीप्रमाणे पुन्हा भरती सुरु करण्यात यावी.
- सध्या कार्यरत असलेल्या 'कार्यकारी सहाय्यक' पदाची अर्हता धारण करणा-या नोंदणी सहाय्यक पदधारकांना, अर्हतेमध्ये असणारी विहित परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच 'लिपिक (कार्यकारी सहाय्यक)' पदावर जाता येईल.

## (60) प्रमुख कर्मचारी अधिकारी व महानगरपालिकेतील इतर विभाग - शिपाई ते मुख्य जमादार संवर्ग

सदर संवर्गातील पदांना सहाव्या वेतन आयोगामध्ये दिलेली वेतनश्रेणी व श्रेणीवेतन राज्य शासनातील समकक्ष पदांपेक्षा जास्तच देण्यात आली आहे, त्यामुळे त्यात पुन्हा श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आलेली नाही.

## (61) प्रमुख लेखापाल (वित्त)

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख लेखापाल (वित्त /कोषागार /पा.पु.म.नि./ म.ख.वि.) | 15600-39100 + GRP 7600 | बदल नाही. |
| २ | उप प्रमुख लेखापाल | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| ३ | लेखा अधिकारी | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5100 |
| ४ | वरिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4400 |
| ५ | कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक | 5200-20200 + GRP 2400 | 5200-20200 + GRP 2800 |

**अभिप्राय –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक या संवर्गातील पदांच्या जबाबदा-या व कर्तव्ये लक्षात घेता, तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक कारभाराचे नियोजन व अंमलबजावणी करण्याचे अत्यंत महत्वाचे काम लक्षात घेऊन या संवर्गातील कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक, वरिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक, तसेच लेखा अधिकारी या पदांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ प्रस्ताविण्यात आली आहे. उप प्रमुख लेखापाल व प्रमुख लेखापाल संवर्गातील पदांचे विद्यमान श्रेणीवेतन सुयोग्य असल्याने त्यात बदल करण्यात आलेला नाही.

## (62) विधी विभाग - विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | कायदा अधिकारी | 15600-39100 + GRP 7600 | बदल नाही. |
| २ | सह कायदा अधिकारी | 15600-39100 + GRP 6600 | 15600-39100 + GRP 7000 |
| ३ | उप कायदा अधिकारी | 9300-34800 + GRP 5400 | 15600-39100 + GRP 6600 |
| ४ | सहाय्यक कायदा अधिकारी | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5400 |
| ५ | सहाय्यक कायदा अधिकारी II | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4500 |
| ६ | कनिष्ठ कायदा अधिकारी | 9300-34800 + GRP 4300 | बदल नाही. |
| | | | |
| ७ | प्रमुख चौकशी अधिकारी | 9300-34800 + GRP 4500 | बदल नाही. |
| ८ | चौकशी अधिकारी | 9300-34800 + GRP 4400 | |
| ९ | वरिष्ठ विधी सहाय्यक | 9300-34800 + GRP 4300 | |
| १० | कनिष्ठ विधी सहाय्यक | 5200-20200 + GRP 2800 | |
| | | | |
| ११ | अधिक्षक (न्यायालय) | 9300-34800 + GRP 4200 | 9300-34800 + GRP 4600 |
| १२ | व्यवस्थापन लिपिक | 5200-20200 + GRP 2800 | 9300-34800 + GRP 4400 |

**अभिप्राय –**

जुन्या अर्हतेनुसार भरण्यात आलेले 'व्यवस्थापन लिपिक' सध्या कार्यरत असलेल्या 'मुख्य लिपिक' संवर्गातून नियुक्त झालेल्या व्यवस्थापन लिपिकांच्या समतूल्य काम पाहत असल्याने 'व्यवस्थापन लिपिका'ला 'मुख्य लिपिक' पदाइतके श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे. तसेच त्या संवर्गातील पदोन्नतीच्या पदाच्या श्रेणीवेतनामध्ये सुध्दा वाढ करण्यात आली आहे.

## (63) शिक्षणविभाग - विशेष शिक्षक

**अभिप्राय –**

बहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना यापूर्वीच परिपत्रक क्र.सा.प्र.वि./उप.प्र.ले./आस्था.२/आर.जी.सेल/१४, दि.२१.११.२०११ अनुसार शासनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी व श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे. शासन निर्णय क्र.वेतन/१२१९/प्र.क्र.१९/१९ टिएनटी 3, दि.२२ फेब्रुवारी २०१९ हा ७ व्या वेतन आयोगामधील वेतनश्रेणी सुधारणेबाबत असल्याने सदर बाबत शिफारस करण्यात आलेली नाही. याबाबत प्रशासनामार्फत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात यावा.

## (64) शिक्षण विभाग - स्काऊटस् आणि गाईडस्

बहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना यापूर्वीच परिपत्रक क्र.सा.प्र.वि./उप.प्र.ले./आस्था.२/आर.जी.सेल/१४, दि.२१.११.२०११ अनुसार शासनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी व श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे. शासन निर्णय क्र.वेतन/१२१९/प्र.क्र.१९/१९ टिएनटी ३, दि.२२ फेब्रुवारी २०१९ हा ७ व्या वेतन आयोगामधील वेतनश्रेणी सुधारणेबाबत असल्याने सदर बाबत शिफारस करण्यात आलेली नाही. याबाबत प्रशासनामार्फत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात यावा.

## (65) शिक्षण विभाग - प्राथमिक शिक्षक संवर्ग

बहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना यापूर्वीच परिपत्रक क्र.सा.प्र.वि./उप.प्र.ले./आस्था.२/आर.जी.सेल/१४, दि.२१.११.२०११ अनुसार शासनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी व श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे. सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने त्याबाबतची शिफारस करण्यात आली नाही. याबाबत प्रशासनामार्फत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात यावा.

## (66) शिक्षण विभाग - माळी-नि-रखवालदार

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | माळी-नि-रखवालदार | 4440 -7440 + GRP 1300<br>5200-20200 + GRP 1800 | 5200-20200 + GRP 2000 |

**अभिप्राय –**

सदर संवर्गाच्या कामाचे स्वरुप 24 X 7 असल्याने व शाळांसाठी स्वतंत्र सुरक्षा रक्षकांची नेमणूक नसल्याने २४ तास सजग व सावधान राहून शाळेच्या इमारतीचे व इतर मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी असल्याने, 'माळी-नि-रखवालदार' या पदाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात येत आहे.

## (67) आधार सामग्री संस्करण विभाग- विविध संवर्ग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ कार्यक्रम निर्धारक | 9300-34800 + GRP 4500 | 9300-34800 + GRP 5100 |
| २ | कार्यक्रम निर्धारक | 9300-34800 + GRP 4400 | 9300-34800 + GRP 4800 |
| ३ | वरिष्ठ संगणक चालक (Computer operator) | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4600 |
| ४ | संगणक चालक (Computer operator) | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4400 |
| ५ | तांत्रिक सहाय्यक (Technical Assistant) | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 |
| ६ | छेदन यंत्रचालक (Punch Operator) | 5200-20200 + GRP 2000 | 5200-20200 + GRP 2400 |

**अभिप्राय –**

यापूर्वी कित्येक वर्षे सदर विभागाने वेतन विषयक प्रणाली उत्तम प्रकारे राबविली ही बाब लक्षात घेऊन सध्या कार्यरत असलेल्या या संवर्गातील कर्मचा-यांच्या मागणीचा विचार होणे आवश्यक वाटते. तसेच सद्यस्थितीमध्ये ते मानव संसाधन विभागात सुध्दा सुयोग्य कामे पार पाडीत असल्याचे लक्षात घेऊन त्यांच्या श्रेणी वेतनामध्ये वाढ करण्यात येत आहे.

सध्या सदर खाते बंद करण्यात आले असल्याने पदोन्नतीच्या अर्हतेमध्ये असलेली मुलाखतीपूर्व अभियोग्यता परीक्षा घेणारी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही व त्याची आवश्यकता नाही.

तांत्रिक सहाय्यक ही पदे निवडीने भरत असल्याने कालबध्द पदोन्नती करिता तांत्रिक सहाय्यक / छेदन यंत्र चालक → संगणक चालक → वरिष्ठ संगणक चालक अशी पदोन्नती शृंखला पदोन्नती देताना आवश्यक आहे. कालबध्द पदोन्नती देताना सदर अर्हतेमधील अभियोग्यता परिक्षेची अट रद्द करुन त्यांना दि.07.07. 2005 पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ देय करण्यात यावा.

## (68) माहिती तंत्रज्ञान विभाग

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ प्रणाली विश्लेषक | 9300 - 34800 + GRP 4600 | 9300 - 34800 + GRP 4800 |
| २ | कनिष्ठ प्रणाली विश्लेषक | 9300 - 34800 + GRP 4200 | 9300 - 34800 + GRP 4300 |

**अभिप्राय -**

शैक्षणिक अर्हता व महानगरपालिकेमधील अनुभव याचा विचार करुन माहिती तंत्रज्ञान विभागाच्या कर्मचारी / अधिका-यांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्यात आली आहे.

## (69 अ) मुंबई अग्निशमन दल – विविध संवर्ग

| अ.क्र | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख अग्निशमन अधिकारी | 15600-39100 + GRP 7600 | बदल नाही. |
| २ | उप प्रमुख अग्निशमन अधिकारी | 15600-39100 + GRP 6600 | बदल नाही. |
| ३ | विभागीय अग्निशमन अधिकारी | 9300-34800 + GRP 5400 | 15600- 39100 + GRP 6000 |
| ४ | सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी | 9300-34800 + GRP 4800 | 9300-34800 + GRP 5400 |
| ५ | वरिष्ठ केंद्र अधिकारी / केंद्र अधिकारी | 9300-34800 + GRP 4300 | 9300-34800 + GRP 4600 |
| ६ | सहाय्यक केंद्र अधिकारी | 5200-20200 + GRP 2800 | 9300-34800 + GRP 4300 |
| ७ | दुय्यम अधिकारी | 5200-20200 + GRP 2800 | बदल नाही. |
| ८ | प्रमुख अग्निशामक | 5200-20200 + GRP 2400 | बदल नाही. |
| ९ | चालक - यंत्र चालक | 5200-20200 + GRP 2400 | बदल नाही. |
| १० | अग्निशामक | 5200-20200 + GRP 2000 | बदल नाही. |

**अभिप्राय –**

मा. उच्च न्यायालयामधील याचिका क्र. २४८/२०१६ व सर्वोच्च न्यायालयाच्या S.L.P. (Civil) Diary No(s). 24964/2022 च्या निर्णयाच्या अनुषंगाने सहाय्यक केंद्र अधिकारी यांना रु. ४३००/- श्रेणीवेतन लागू करण्यात आले आहे व त्या अनुषंगाने इतर संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## (69 ब) मुंबई अग्निशमन दल – कार्यशाळा तांत्रिक कर्मचारी वर्ग

अन्य शिफारशी अंतर्गत अ.क्र. १३ मध्ये शिफारस केल्यानुसार ज्या वेतनश्रेणी संकेतांकांच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्या वेतनश्रेणी संकेतांकामध्ये असलेल्या संवर्गांच्या श्रेणीवेतनामध्ये बदल लागू होईल.

## (70) प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) / प्रमुख अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या) - गटार स्वच्छक (मलनि:सारण प्रचालन निरिक्षक)

| अ.क्र. | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | मलनि:सारण प्रचालन निरिक्षक | 5200-20200 + GRP 2100 | 5200-20200 + GRP 2400 |

**अभिप्राय:-**

वेतन विसंगती समिती २०१९ च्या शिफारशीनुसार 'गटार स्वच्छक' (Drainage Assistant) या पदाचे नामानिधान बदलून 'मलनि:सारण प्रचालन निरिक्षक'असे करण्यात आले असून त्याच्या श्रेणीवेतनामध्ये रु.२००० वरुन रु.२१०० करण्यात आले आहे. तथापि अर्हतेनुसार पदधारक हे 'स्वच्छता निरिक्षक' या पदाची परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याने व कामाचे स्वरुप लक्षात घेता त्यांच्या श्रेणीवेतनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे.

## (71) रस्ते दुरुस्ती व मलनि:सारण प्रचालन, पर्जन्य जल वाहिन्या व जल अभियंता विभागातील कामगार संवर्ग -

अन्य शिफारशी अंतर्गत अ.क्र. १३ मध्ये शिफारस केल्यानुसार ज्या वेतनश्रेणी संकेतांकांच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे त्या वेतनश्रेणी संकेतांकामध्ये असलेल्या संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये बदल लागू होईल.

## (72) संशोधन अधिकारी

वेतन विसंगती समिती २०१२ च्या शिफारशीनुसार 'कनिष्ठ संशोधन सहाय्यक' या पदाचे नामाभिधान 'संशोधन अधिकारी' असे करुन सदर पदास रु. ९३००-३४८०० + श्रेणीवेतन रु. ४२००/- करण्यात आले. तसेच सदर संवर्ग मृत संवर्ग (Dying Cadre) म्हणून घोषित करण्यात आला आहे. सदर पदाच्या श्रेणीवेतनामध्ये रु. २८००/- वरुन रु. ४२००/- अशी वाढ यापूर्वीच केली असल्याने पुन्हा वाढ करण्यात आली नाही.

## वैयक्तिक निवेदनांबाबत समितीने केलेल्या शिफारशी :-

**(1) श्रीमती सुप्रिया साटम, श्रीमती सुस्मित पाटील व श्रीमती शितल मिसाळ, प्रशासकीय अधिकारी यांनी समितीपुढे आपली वैयक्तिक निवेदने सादर केली.**

सामान्य प्रशासन विभागाने, क्र.उपप्रमुख लेखापाल (आस्था.२)/ आरजीसेल/२, दि.०२.०६.२०२३ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे.

सदर परिपत्रकामधील निदेशानुसार कार्यवाही झाल्यानंतर श्रीमती सुप्रिया साटम, श्रीमती सुस्मिता पाटील व श्रीमती शितल मिसाळ, प्रशासकीय अधिकारी यांच्या वेतनामधील विसंगती दूर होईल.

**(2) श्रीमती अधिश्री मोहन गोखले, माजी प्रशासकीय अधिकारी, जलमापके महसूल, श्रीमती श्रध्दा वसंत मेस्त्री, प्रशासकीय अधिकारी (लो.टि.रु.) व श्रीमती वर्षा संजय सबनीस, प्रशासकीय अधिकारी यांनी समितीपुढे आपली वैयक्तीक निवेदने सादर केली.**

वरील तिन्ही कर्मचा-यांची मूळ नियुक्ती लिपिक पदावरील आहे व त्या मुख्य लिपिक पदाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांना महानगरपालिकेच्या तत्कालीन धोरणानुसार मुख्य लिपिक पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती.महानगरपालिकेतीलअधिकारी / कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करतेवेळी उपरोक्त कर्मचारी विविध विभागात कार्यरत असल्याने आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी त्यांचा विचार करण्यात आला नाही असे दिसून आले आहे. तथापि त्यांची मुख्य लिपिक पदावरील नियुक्ती ही तदर्थ स्वरुपाची असल्याने दि. ०७.०७.२००५ रोजी किंवा निम्न पदावरील नियुक्तीची १२ वर्षे सेवापूर्ण होईल त्या दिवशी संबंधितांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा. महानगरपालिकेचे कालबध्द पदोन्नती योजनेचे परिपत्रक क्र.सा.प्र.वि./वे.सु.कक्ष/०३, दिनांक २४.०७.२००७ रोजी निर्गमित झाले त्या दिवशी संबंधित कर्मचारी ज्या विभागात कार्यरत होते त्यांनी पहिल्या लाभाची कार्यवाही करावी.

**(3) श्री. मंगेश गुणाजी साळुंके, संमार्जक यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सहावा वेतन आयोग दि. ०१.०७.२००५ / ०१.०१.२००६ पासून लागू करण्यात आला. त्यामुळे त्यापूर्वी महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगामधील तरतूदीनुसार १९९५ च्या वेतनश्रेणीवर १.८६ च्या गुणकाचा वापर करुन दि.०१.०७.२००५ / ०१.०१.२००६ रोजी वेतन निश्चिती करण्यात आली.

तथापि, दि. ०१.०७.२००५ / ०१.०१.२००६ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची सहाव्या वेतन आयोगामधील नवीन वेतनश्रेणी व श्रेणीवेतनामध्ये परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.२) /आरजीसेल/०५, दि. १५.०६.२०१३ नुसार वेतन निश्चिती करण्यात आली.

श्री. मंगेश गुणाजी साळुंके, संमार्जक यांची नियुक्ती ०९.०२.२००५रोजी झाली आहे. परंतु त्यांना दि. ०७.०७.२००७ रोजी महानगरपालिका सेवेत नियमित तत्वावर नियुक्ती झाली असल्याने त्यांना उपरोक्त नमूद सहाव्या वेतन आयोगामधील तरतूदीनुसार वेतन निश्चितीचा फायदा अनुज्ञेय झाला नाही.

यास्तव त्यांच्या निवेदनात तथ्य नसल्याने सदर प्रकरण वेतन विसंगती मध्ये बसत नसल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आले आहे.

**(4) श्रीमती मुगल सईदा बेगम इकबाल, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

सदर प्रकरणी श्रीमती मुगल सईदाबेगम इकबाल व श्री. खान जफरुल्लाह सरफराज यांच्या वेतन निश्चितीची प्रपत्रे पडताळली असता असे निदर्शनास आले की दि. २०.०७.२०१० रोजी श्री. खान जफरुल्लाह सरफराज यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू केल्यावर त्यांचे मूळ वेतन कमी झाल्याचे दिसून येते. सदर बाबत श्रीमती मुगल सईदाबेगम इकबाल यांना दि.१५.०९.२००८ रोजी त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करुन सुध्दा त्यांचे वेतन दि. ०१.०७.२०११ रोजी श्री. खान जफरुल्लाह सरफराज यांच्यापेक्षा कमी असल्याचे दिसून येते. यास्तव सदर प्रकरणी दि.२०.०७.२०१० रोजी श्रीमती मुगल सईदाबेगम इकबाल यांचे वेतन श्री. खान जफरुल्लाह सरफराज यांच्या वेतनाएवढे करण्यात यावे.

**(5) श्री.मोगल इकबाल इस्माईल, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

सदर कर्मचा-याचे वेतन विसंगतीबाबतचे निवेदन समितीकडे प्राप्त झाले. परंतु, त्याबाबत संबंधित विभागकडून वेतन निश्चिती प्रपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. त्यामुळे याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही.

तथापि, श्रीमती मुगल सईदाबेगम इकबाल, सेवानिवृत्त मुख्याध्यापिकांच्या धर्तीवर श्री.मोगल इकबाल इस्माईल, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचे वेतन विसंगतीचे प्रकरण तपासून संबंधित खात्याने त्याबाबत कार्यवाही करावी.

**(6) श्रीमती स्मिता श्रीराम बुरटे(प्रमुख लेखापाल (वित्त विभाग)यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

श्रीमती बुरटे यांच्या निवेदनामधील तपशिल पाहिला असता, सदर प्रकरणी दि.०७.०७.२००५ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत. सहाव्या वेतन आयोगामध्ये सर्व कर्मचा-यांचा वेतनवाढीचा दिनांक १ जुलै असा करण्यात आला व वेतनवाढीच्या नियमात बदल झाला आहे.

वेतनवाढीच्या नियमात बदल झाल्याने मूळ वेतन कमी झाल्याचे निदर्शनास येते. यास्तव हे प्रकरण वेतन विसंगती प्रकारामध्ये मोडत नाही. यास्तव या प्रकरणात कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

**(7) श्रीमती विजया खेमराज जोशी, अधिपरिचारिका (लो.टि.म.स.)यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

श्रीमती जोशी यांच्या निवेदनामधील तपशिल पाहिला असता, सदर प्रकरणी दि.०७.०७.२००५ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत. सहाव्या वेतन आयोगामध्ये सर्व कर्मचा-यांचा वेतनवाढीचा दिनांक १ जुलै असा करण्यात आला व वेतनवाढीच्या नियमात बदल झाला आहे.

वेतनवाढीच्या नियमात बदल झाल्याने मूळ वेतन कमी झाल्याचे निदर्शनास येते. यास्तव हे प्रकरण वेतन विसंगती प्रकारामध्ये मोडत नाही. यास्तव या प्रकरणात कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

**(8) श्री. बापूसाहेब रामराव पडाळे, प्रयोगशाळा सहाय्यक यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

| अ.क्र | पदनाम | ६व्या वेतन आयोगानुसार विद्यमानवेतनश्रेणी व श्रेणीवेतन | ६व्या वेतन आयोगानुसार प्रस्तावित वेतनश्रेणी व श्रेणीवेतन |
|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा सहाय्यक | 5200-20200 + GRP 1950 | 5200-20200 + GRP 2000 |

**अभिप्राय –**

राज्यशासनामध्ये प्रयोगशाळा सहाय्यक या पदास रु.२०००/- श्रेणीवेतन असल्याने त्याच धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील ‘प्रयोगशाळा सहाय्यक’ पदाच्या श्रेणीवेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

**(9) श्रीमती शितल मिसाळ, व.ले.प. व ले.स. यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

पदोन्नती व वेतन सुधारणेमुळे 'वेतन विसंगती' निर्माण झाल्यास त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात डी.पी.ए.आर. ने परिपत्रक क्र.उपप्रमुख लेखापाल(आस्था.२)/आरजीसेल/२, दि. ०२.०६.२०२३ निर्गमित केले आहे. तदनुषंगाने श्रीमती शितल मिसाळ यांच्या प्रकरणी योग्य तो निर्णय संबंधित खात्यामार्फत घेण्यात यावा.

**(10) श्रीमती चित्रा पंडीत, प्रशासकीय अधिकारी, श्रीमती शामली घनशाम वेळापुरे, प्रशासकीय अधिकारी व श्रीमती प्राजक्ता प्रकाश तिर्लोटकर, प्रशासकीय अधिकारी यांनी आपले वैयक्तीक निवेदन समिती समोर सादर केले. (सेवांतर्गत प्रगती योजनेनुसार पदोन्नतीचा तिसरा लाभ मिळणेबाबत.)**

याबाबत महानगरपालिका प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

**(11) श्री. शैलेश शशिकांत नारकर, कनिष्ठ लेखा परीक्षा सहाय्यक, श्री. राजकुमार चि.रेडकर, कनिष्ठ लेखा परीक्षा सहाय्यक व श्री. प्रसाद वडके, कनिष्ठ लेखा परीक्षा सहाय्यकयांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले. सदर कर्मचा-यांनी सातव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीमध्ये झालेला अन्याय दूर करण्याबाबत मागणी करण्यात आली.**

याबाबत महानगरपालिका प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

**(12) डॉ. शिखरचंद जैन, सहाय्यक प्राध्यापक, टो.रा.वैदयकीय महाविदयालय यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

टो.रा.वैदयकीय महाविदयालयाच्या आस्थापनेवर डॉ. शिखरचंद जैन हे रोगप्रतिबंधक व सामाजिक वैदयकशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक (लोकसंख्या शास्त्र व जीवसांख्यकी शास्त्र) या पदावर कार्यरत होते.

डॉ. शिखरचंद जैन यांना दि. ०१.०१.२००६ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार विदयापीठ अनुदान वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

डॉ. शिखरचंद जैन यांनी परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/१९, दि. १७.१२.२०११ अन्वये दर्जा पदोन्नती देण्याची मागणी केली आहे.

तथापि, डॉ.शिखरचंद जैन, सहाय्यक प्राध्यापक हे कार्यरत असलेल्या विभागात 'सहयोगी प्राध्यापक' हे पद उपलब्ध नसून, डॉ. शिखरचंद जैन यांचे सहाय्यक प्राध्यापक हे एकाकी पद आहे असे प्रशासनाने निदर्शनास आणुन दिले आहे.

भारतीय वैदयक परिषदेच्या निकषानुसार 'रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधशास्त्र' या विभागात 'सहाय्यक प्राध्यापक' या संवर्गाचे एकच पद आवश्यक करण्यात आले आहे. या विभागात पदोन्नतीची शृंखला नाही. त्यामुळे फक्त पदोन्नतीकरीता 'सहयोगी प्राध्यापक' हे पद निर्माण करणे उचित होणार नाही.

यास्तव डॉ. शिखरचंद जैन यांना परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/१९, दि.१७.१२.२०११ अन्वये दर्जा पदोन्नती देण्याची शिफारस करता येत नाही.

**(13) डॉ.(श्रीमती) छाया वर्मा, प्राध्यापक, बा.य.ल. धर्मादाय रुग्णालय व टो.रा.वैदयकीय महाविदयालययांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले. (पदव्युत्तर भत्ता / अभ्यास भत्ता लागू करण्याबाबत.)**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैदयकीय महाविदयालयामध्ये भौतिकोपचार व व्यवसायोपचार शास्त्र विभाग कार्यरत आहे. सदर विभाग महाविदयालयामध्ये भौतिकोपचार व व्यवसायोपचार शाळा व केंद्र म्हणून गणला जातो. सदर विभागातील प्राध्यापक संवर्गातील पदांना विदयापीठ अनुदान आयोगाची (UGC) श्रेणी लागू आहे.

वैदयकीय महाविदयालयामधील प्राध्यापक संवर्गातील पदांना पदव्युत्तर भत्ता तसेच अभ्यास भत्ता लागू आहे. सदर भत्ता लागू करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये वैदयकीय महाविदयालये व दंत महाविदयालये असा उल्लेख आहे. तथापि, भौतिकोपचार व व्यवसायोपचार शाळा व केंद्र या विभागाचा उल्लेख नाही. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर भत्ते अनुज्ञेय नाहीत. यास्तव डॉ.(श्रीमती) छाया वर्मा, प्राध्यापक यांना पदव्युत्तर भत्ता / अभ्यास भत्ता देय करता येत नाही.

**(14) श्री. प्रकाश व्ही. शिरसाट, कार्यकारी अभियंता (म.प्र.) सध्या उपसंचालक, MCMCR यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कामगार / कर्मचारी संघटनांसोबत, ज्यावेळी वेतन सुधारणेबाबतचे करार होतात, ते नेहमीच पूर्वलक्षी प्रभावाने मान्य केले जातात. त्यामुळे ज्यांना असुधारित वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती मिळालेली असते, अशावेळी कर्मचारी त्यावेळच्या नियमानुसार, नियम क्र.३२ चा योग्य विकल्प निवडतात. परंतु सुधारित वेतनश्रेणीमध्ये, नियमित वेतनवाढीचे दिनांक बदलल्यास, बदललेल्या वेतनवाढीच्या दिनांकानुसार, पुन्हा महापालिका सेवानियमावली नियम क्र.३२ चा योग्य विकल्प निवडण्याची संधी कर्मचा-यांना मिळणे आवश्यक आहे.

श्री. शिरसाट यांची सन २००८ पर्यंत वार्षिक वेतनवाढ ०१.१२.२००८ अशी होती. त्यांना 'सहाय्यक अभियंता' या पदावरील पदोन्नती जानेवारी २००९ मध्ये दि. २२.०१.२००९ रोजी म्हणजेच वेतनवाढ देय झाल्यानंतर मिळाली असल्याने त्यांना असुधारित वेतनश्रेणीमध्ये बृहन्मंबई महानगरपालिका सेवा नियम ३२ चा पर्याय दोन चा विकल्प मागण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही.

सहाव्या वेतन आयोगामधील तरतूदीनुसार कर्मचा-यांचा वेतनवाढीचा दिनांक १ जुलै असा झाला आहे. त्यामुळे सुधारित वेतनश्रेणीमध्ये श्री. शिरसाट यांची नियमित वेतनवाढ दि.०१.०७.२००८ अशी झाली आहे. त्यांना पदोन्नती जानेवारी २००९ मध्ये दिली असल्याने त्यांना महापालिका सेवानियम, १९८९ मधील नियम क्र.३२ (अ) मधील पर्याय २ या विकल्पाचा फायदा अनुज्ञेय होत आहे. त्यामुळे सुधारित वेतनश्रेणी मध्ये त्यांना फायदेशीर असलेला विकल्प त्यांना प्रशासनाने देणे आवश्यक ठरते असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे श्री. शिरसाट हे जानेवारी २००९ मध्ये महापालिका सेवानियम, १९८९ मधील नियम क्र.३२ (अ) मधील पर्याय - २ चा विकल्प मिळण्यास पात्र ठरतात. यास्तव, त्यांना फायदेशीर असलेल्या विकल्प विचारात घेऊन, त्यानुसार त्यांची पुन्हा वेतन निश्चिती करुन, त्यानुसार त्यांना देय असलेली थकबाकी देण्यात यावी.

**(15) डॉ.(श्रीमती) संगिता हसनाळे, उपायुक्त यांनी आपले वैयक्तीक निवेदन समितीसमोर सादर केले.**

डॉ.संगिता राजेश हसनाळे यांना वैदयकीय अधिकारी या पदावर कार्यरत असताना परिपत्रक क्र. साप्रवि/उप प्र.ले.(आस्था.2)/वेसुकक्ष/२६, दि.२९.११.२००८ अन्वये पाचवा वेतन आयोग लागू झालेला आहे. सदर परिपत्रकानुसार पाचव्या वेतन आयोगात वैदयकीय अधिकारी या पदाची रु. 10000-325-14500 ही वेतनश्रेणी आहे. त्याचप्रमाणे सदर परिपत्रकात कालबध्द पदोन्नती राज्य शासनाप्रमाणे दिली जाईल असे नमूद केले आहे.या संदर्भात शासन निर्णय क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२-९९/सेवा-३, दि. २० जुलै २००१ नुसार कालबध्द पदोन्नती ही योजना रु.8000-13500 व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणा-या अधिकारी / कर्मचा-यांना लागू होईल असे निर्देश आहेत. त्यामुळे वैदयकीय अधिकारी या पदास पाचव्या वेतन आयोगात कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय नाही.

सहाव्या वेतन आयोगात श्रेणीवेतन ही संज्ञा वापरण्यात आली. यासंदर्भातील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक क्र.साप्रवि/वेसुकक्ष/१६, दि.०१.०३.२०१६ अन्वये सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सहाव्या वेतन आयोगाच्या कमाल वेतन बँड पीबी-3 (15600-39100)

+ GRP 5400 घेणा-या कर्मचा-यांना लागू राहील असे नमूद केले आहे. वैदयकीय अधिकारी या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार पीबी-3 (15600-39100) + GRP 6000 असल्याने कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू नाही.

यास्तव डॉ.(श्रीमती) संगिता हसनाळे उपआयुक्त यांना कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय नाही.

**(16) श्रीमती रिमा सु. ढेकणे, प्रमुख कर्मचारी अधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारी या पदावरील कालबध्द पदोन्नतीचा लाभ घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत आपले निवेदन समितीसमोर सादर केले.**

श्रीमती रिमा सु. ढेकणे यांची 'चौकशी निरिक्षक' या पदावरील नियुक्ती सावधि तत्वावर असल्याने, त्यांची 'मुख्य लिपिक' पदावरील सेवाज्येष्ठता कायम ठेऊन, 'चौकशी निरिक्षक' या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे कालबध्द पदोन्नतीकरिता त्यांची 'मुख्य लिपिक' व 'चौकशी निरिक्षक' या दोन्ही पदांवरील सेवा एकत्रित करुन त्यांचा कालबध्द पदोन्नतीचा दिनांक निश्चित करण्यात आला आहे.

सावधि तत्वावर / तात्पुरत्या तत्वावर नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांचा त्यांच्या मूळ खात्यात / मूळ पदावर दोन वर्षे धारणाधिकार असतो. त्यामुळे सदर धारणाधिकार संपण्यापूर्वी, त्यांची तात्पुरती नियुक्ती खंडीत करण्याची जबाबदारी प्रशासनाची होती. तथापि, प्रस्तुत प्रकरणी प्रशासनाने आवश्यकतेनुसार सदर कालावधी दोन वर्षांनंतर सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीने, पुढे वाढविला असल्यास, कर्मचा-यांचा धारणाधिकार दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी सातत्यित ठेवणे अनिवार्य ठरते.

यासंदर्भात यापूर्वी सर्वसाधारण विभागातील श्रीमती संध्या राजेंद्र नारगोळकर व करनिर्धारण व संकलन या खात्यातील श्रीमती श्यामल रावराणे यांच्या प्रकरणी 'मुख्य लिपिक' व 'चौकशी निरिक्षक' या पदांवरील एकत्रित सेवा लक्षात घेऊन प्रशासकीय अधिकारी या पदावरील कालबध्द पदोन्नतीचा दिनांक निश्चित करण्यात आला आहे, व तसे अभिप्राय तत्कालीन उप प्रमुख लेखापाल (आस्था.२) यांनी दोन वेगवेगळया वेळी पण एकच अभिप्राय दिल्याचे निदर्शनास येते. जर या पूर्वी अशी प्रकरणे एका विशिष्ट धोरणांतर्गत मंजूर झाली असल्यास आता या प्रकरणी पुन्हा नव्याने आक्षेप घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे समितीचे मत आहे.

यास्तव श्रीमती रिमा सु.ढेकणे यांना 'चौकशी निरिक्षक' व 'मुख्य लिपिक' या दोन्ही पदांवरील एकत्रित सेवा विचारात घेऊन कालबध्द पदोन्नतीचा दिनांक निश्चित करण्यात यावा.

## समितीने केलेल्या मुद्येनिहाय शिफारशी –

### मुद्दा क्रमांक 1 :

**शासनातील संवर्गाशी तुलना करणे -**

- समितीने शासनातील विविध संवर्गाशी तुलना करून अहवाल सादर केला आहे.

### मुद्दा क्रमांक 2 :

**नविन निवेदनांचा अभ्यास -**

- समितीने नविन निवेदनांचा अभ्यास करून अहवाल सादर केला आहे.

### मुद्दा क्रमांक 3 :

**वेतन सुधारणा समिती-२०१९ ने सुचविल्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील Printing Press, Chief Engineer (Mechanical & Electrical) मधील कामगारांचे Skilled, semi-skilled, unskilled असे वर्गीकरण करुन त्यांना योग्य वेतनश्रेणी देण्याबाबतचा अहवाल सादर करणे –**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये चतुर्थश्रेणीमध्ये 'कामगार' या संवर्गात भरती करुन तदनंतर त्यांना विविध विभागात कामाकरिता पाठविले जाते. त्या त्या विभागातील कामानुसार त्यांची पुढील पदोन्नतीची साखळी तयार करण्यात येते.
- प्रत्येक विभागातील कामानुसार व प्राप्त केलेल्या विशेष अर्हतेनुसार पदोन्नती साखळीमधील विविध पदांच्या अर्हता निर्धारित करण्यात आल्या आहेत.
- कामगारांचे Skilled, semi-skilled, Unskilled असे वर्गीकरण करावयाचे झाल्यास त्यांचे भरती / सेवानियम (Recruitment Rules) व साखळीमधील प्रत्येक पदाच्या अर्हता बदलाव्या लागतील. याकरिता काही संवर्ग एकत्र केल्यास किंवा कालबाहय ठरविल्यास त्या अनुषंगाने बिंदुनामावली / आरक्षण / अनुशेष यामध्ये सुध्दा बदल होण्याची शक्यता आहे.
- Printing Press, Chief Engineer (Mechanical & Electrical) व Transport विभागातील तंत्रज्ञानामध्ये काळानुसार अनेक बदल झाले आहेत.
- आधुनिक तंत्रज्ञानामुळे यापूर्वी अस्तित्वात असलेली पदे व त्या पदांचे कामकाज यामध्ये खूपच बदल झाला आहे. त्यामुळे पदांची आवश्यकता कमी झाली आहे. तसेच, नवीन यंत्रसामग्री व तंत्रज्ञानानुसार Skilled Worker ही संकल्पना सतत बदलत आहे.

- उपरोक्त सर्व गोष्टी विचारात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील सध्या कार्यरत असलेल्या कामगार संवर्गाचे Skilled, semi-skilled, unskilled असे वर्गीकरण करणे संयुक्तिक होणार नाही.
- सद्य परिस्थितीमध्ये त्यांची कामे नवीन तंत्रज्ञानानुसार ज्याप्रमाणे समायोजित करण्यात आली आहेत ती सुरु ठेवणे व Unskilled कामगार जसजसे निवृत्त होतील तसतसे कामगार पदाची नवीन भरती करताना आवश्यकतेनुसार skilled labour ची भरती करणे योग्य ठरेल.

**मुद्दा क्रमांक 4 :**

**मुख्य रुग्णालये व Peripheral रुग्णालयातील अनेक संवर्ग आणि विविध पदनामे यांच्यामधील अस्वस्थता व गोंधळ टाळून सुसुत्रता आणणे.**

- सामान्य प्रशासन विभागाच्या मागासवर्ग कक्षाकडे उपलब्ध असलेल्या सर्व संवर्गाच्या अर्हता तसेच पदांची आवश्यकता, इ. माहितीचा अभ्यास करुन याबाबतच्या गोंधळाचे निराकरण करणे शक्य आहे. यास्तव सदर कामकाज मा. गिरीराज वेतन विसंगती समिती यांनी शिफारस केल्यानुसार सध्या कार्यरत असलेले मोठया रुग्णालयाचे संचालक / अधिष्ठाता यांची स्वतंत्र समिती नेमून त्यांच्याकडे हे कामकाज सोपविण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली आहे.

**मुद्दा क्रमांक 5 :**

- श्री. कुबल (निवृत्त अभियंता) यांच्या निवेदनाबाबत परिपत्रक क्र.साप्रवि / उपप्रले (आस्था-2)/आरजीसेल/10 दि.08.09.2023 मध्ये सविस्तरपणे नमूद केले आहे.

**मुद्दा क्रमांक 6 :**

**बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचारी / अधिका-यांना १९९५ च्या वेतनश्रेणीमधील कमाल टप्प्याच्या ४०% एवढी रक्कम ग्रेड पे म्हणून देण्याबाबतचा अभ्यास करुन अहवाल देणे.**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दि.०१.०७.२००५ / ०१.०१.२००६ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवर वेतनश्रेणी देय करण्यात आल्या. तेव्हा काही संवर्ग वगळता इतर संवर्गाकरिता पाचवा वेतन आयोग विचारात घेण्यात आला नव्हता.
- यामध्ये काही संवर्गातील कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीमधील, श्रेणीवेतनाबाबतची(GRP)(ग्रेडपे) विसंगती दूर करण्याकरिता यापूर्वी श्री. हकीम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती, तदनंतर सन २०१२ ते सन २०१४ मधील अतिरिक्त आयुक्त यांची विसंगती समिती व सन २०१९ ची वेतन सुधारणा समिती अशा एकूण तीन समित्यांनी, श्रेणीवेतनाबाबत अभ्यास

करुन विविध संवर्गाच्या ग्रेड पे मध्ये सुधारणांची शिफारस केली आहे. त्यानुसार बहुतांश संवर्गाना १९९५ च्या वेतनश्रेणीमधील कमाल टप्प्यांच्या ४०% एवढी किंवा त्यापेक्षा अतिरिक्त रक्कम (GRP)ग्रेडपे म्हणून देय झाली आहे.

- उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, पुन्हा बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील सर्व संवर्गाना १९९५ च्या वेतनश्रेणीमधील कमाल टप्प्याच्या ४०% एवढी रक्कम ग्रेड पे म्हणून देय करुन पुन्हा ६व्या व ७व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीची शिफारस करणे संयुक्तिक नाही.
- यास्तव, सदर मागणी कायम स्वरुपी निकालात काढून भविष्यात पुन्हा यावर प्राप्त होणा-या कोणत्याही प्रकारच्या निवेदनांचा विचार करण्यात येऊ नये अशी शिफारस करण्यात आली आहे.

**मुद्दा क्रमांक 7 :**

**राज्य सरकारी कर्मचा-यांप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचारी / अधिका-यांना कालबध्द पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणे.**

- केंद्र शासनाकडे कालबध्द पदोन्नतीची योजना १३ सप्टेंबर १९९१ पासून अंमलात आली.
- केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाकडे सदर योजना ८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये, १ ऑक्टोबर, १९९४ पासून अंमलात आणली. राज्य शासनाकडे सुध्दा कालबध्द पदोन्नतीची योजना पूर्वलक्षी प्रभावाने १९९१ पासून लागू करण्यात आली नाही.
- राज्य शासनाच्या धर्तीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सदर कालबध्द पदोन्नतीची योजना महानगरपालिका ठराव क्रमांक ४२५ दिनांक ०७.०७.२००५ च्या मंजूरीनुसार दि.०७.०७.२००५ पासून लागू करण्यात आली.
- तद्‌नतर पुन्हा एकदा साप्रवि/वेसुकक्ष/१६, दि.०१.०३.२०१६ अन्वये, शासनाच्या धर्तीवर सदर योजनेचे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने अंमलात आणली.
- तदनंतर पुन्हा एकदा साप्रवि/आरजीसेल/१०, दिनांक ०५.०७.२०२१ अन्वये सदर योजनेत सुधारणा करण्यात आली.
- आतापर्यंत बहुतांश कर्मचा-यांना सदर योजनेअंतर्गत २ ते ३ लाभ दि.०७.०७.२००५ पासून मंजूर झाले आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कालबध्द पदोन्नतीची योजना दि.०७.०७.२००५ पासून अंमलात येवून १६/१७ वर्षांचा कालावधी झाला आहे.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये, काही संवर्गामध्ये, दीर्घ कालावधीसाठी तदर्थ तत्वावर नेमणूका झाल्यामुळे, कर्मचा-यांना या योजनेचा तिसरा लाभ मिळत नाही असे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर योजना पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर करण्याबाबतची विनंती होत आहे.
- उपरोक्त मुद्दयांचा विचार करता, केवळ काही संवर्गामध्ये / कर्मचा-यांना लाभ मिळत नाही याकरिता१६ वर्षांपासून अंमलात आलेली कालबध्द पदोन्नतीची योजना राज्य शासनाने लागू केलेल्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे संयुक्तिक नाही. तसे केल्यास,आतापर्यंत मंजूर झालेल्या सर्व प्रकरणांबाबत पुन्हा नव्याने कार्यवाही करावी लागेल व त्यामुळे प्रशासकीय गोंधळ निर्माण होईल.
- यास्तव,राज्य सरकारी कर्मचा-यांप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कालबध्द पदोन्नतीची योजना पूर्वलक्षी प्रभावाने सन १९९४ पासून लागू करण्याची शिफारस करणे अयोग्य ठरेल. यास्तव याची शिफारस करण्यात आली नाही.

**मुद्दा क्रमांक 8 :**

**(अ) तदर्थ तत्वावरील कर्मचा-यांची सेवा कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना याकरिता अर्हताकारी सेवा गणण्यात यावी याबाबतचा अभ्यास करुन अहवाल तयार करणे.**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये केंद्र शासन / राज्य शासनाच्या धर्तीवर, कालबध्द पदोन्नतीची योजना, महानगरपालिकेच्या मंजूरीच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ०७.०७.२००५ पासून अंमलात आली.
- सदर योजनेमधील अटींनुसार, एकाच पदावरील सातत्याच्या १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीमधील वरच्या पदाची वेतनश्रेणी देण्यात येते.
- जे 'लिपिक / क.ले.प.वले.स. (कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक)', 'मुख्य लिपिक' / 'व.ले.प.व ले.स. (वरिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक)' या पदावर तदर्थ तत्वावर कार्यरत होते, त्यांचा लिपिक पदावरील धारणाधिकार लक्षात घेऊन, दि. ०७.०७.२००५ किंवा त्यानंतर ज्या दिवशी क.ले.प.व ले.स. / लिपिक पदावरील '१२' वर्षांचा कालावधी पूर्ण करतील त्या दिनांकाला कालबध्द पदोन्नतीच्या पहिल्या लाभासाठी पात्र होतील. यास्तव त्या दिनांकाला त्यांना कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ मिळाला असे समजण्यात यावे. सदर बाब 'मुख्य लिपिक' व प्रमुख लेखापाल खात्यामधील 'व.ले.प.व ले.स.' या संवर्गासाठी लागू होईल.

**(ब) अनेक वर्षे तदर्थ तत्वावर मुख्य लिपिक पदावर कार्यरत सन १९९२ च्या बॅचच्या नगर अभियंता विभागातील कर्मचा-यांच्या वेतन विसंगतीबाबत –**

- महानगरपालिकेने दिलेल्या मंजूरीची अंमलबजावणी ही मंजूरीच्या दिनांकापासून होते, ही सर्वमान्य बाब आहे. सबब, सन १९९२ च्या मुख्य लिपिकांच्या बॅचमधील फक्त नगर अभियंता विभागातील खुल्या प्रवर्गाच्या कर्मचा-यांना महापालिका ठराव क्र. ८३५ चा मंजूरी दिनांक २८.११.२००० हा केवळ कालबध्द पदोन्नती देण्याच्या प्रयोजनार्थ मुख्य लिपिक पदावर मानीव दिनांक दिल्यास ते नैसर्गिक न्यायास अनुसरुन होईल व त्यांचेबाबत झालेली वेतन विसंगती काही प्रमाणात दूर होईल.

**(क) सार्वजनिक आरोग्य परिचारिका या संवर्गातील दिर्घ काळ तदर्थ त्तवावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती देण्याबाबत –**

- दिर्घ कालावधीकरिता सार्वजनिक आरोग्य परिचारिका (PHN) पदावर तदर्थ तत्वावर कार्यरत असणा-या सार्वजनिक आरोग्य परिचारिकांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता त्यांना दि.०७.०७.२००५ रोजी सार्वजनिक आरोग्य परिचारिका (PHN) पदावर कालबध्द पदोन्नती देण्याची मागणी संघटनांकडून झाली आहे.
- कर्मचारी पदोन्नतीच्या पदावर तदर्थ तत्वावर कार्यरत असताना त्याचा निम्न पदावर धारणाधिकार कायम असतो.
- यास्तव सार्वजनिक आरोग्य परिचारिका (PHN) या पदावर तदर्थ तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचा त्यांच्या निम्न संवर्गातील पदावर म्हणजेच सहाय्यक परिचारिका प्रसविका (ANM) पदावर धारणाधिकार असल्याने दिनांक ०७.०७.२००५ किंवा कर्मचारी ज्या दिनांकाला सहाय्यक परिचारिका प्रसविका (ANM) या पदावरील १२ वर्षांची सेवा कालावधी पूर्ण करतील त्या दिनांकाला यापैकी जे नंतर असेल त्या दिनांकाला त्याला कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ मिळाला असे समजण्यात यावे.

**मुद्दा क्रमांक 9 :**

**महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वाहतूक भत्त्याच्या रक्कमेवर महागाई भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणे.**

- सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवर महानगरपालिका कर्मचा-यांच्या वेतनश्रेणी दि.०१.०४.२००५ / ०१.०७.२००५ / ०१.०१.२००६ च्या प्रभावाने वेगवेगळया सुत्रांनुसार सुधारित करण्यात आल्या.

- यामध्ये श्रेणी वेतनानुसार (GRP) वाहतुक भत्ता व त्यावर अधिक महागाई भत्ता देण्यात येत होता. (संदर्भ साप्रवि/उपप्रले/(आस्था–२)/वेसुकक्ष/२९ दि. २३.१०.२००९.)
- दि.१९.०९.२०११ रोजी संघटनांशी केलेल्या करारानुसार पुन्हा नव्याने वेतनश्रेणींची पुनर्रचना करण्यात आली.
- सदर करारानुसार वाहतूक भत्त्याचे दर शासनाच्या धर्तीवर दि.०१.०९.२०११ पासून सुधारीत करण्यात आले. तसेच, त्यावर अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता सुध्दा काढून टाकण्यात आला. सदर आदेश परिपत्रक क्रमांक साप्रवि/उपप्रले(आस्था-२)/वेसुकक्ष/१८ दिनांक १६.१२.२०११ अन्वये सदर बदल प्रसारित करण्यात आला.
- वाहतूक भत्त्यांमधील सदर बदल, संघटनांशी झालेल्या करारानुसार तसेच राज्य शासनाच्या धर्तीवर निश्चित करण्यात आले होते.
- वाहतूक भत्त्याचे सुधारीत दर व त्यावर महागाई भत्ता न देण्याबाबतचा निर्णय सर्व संघटनांशी झालेल्या चर्चेअंती तत्कालीन प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे पुन्हा वाहतूक भत्त्याच्या रक्कमेवर महागाई भत्ता अनुज्ञेय करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**मुद्दा क्रमांक 10 :**

- सहाव्या वेतन आयोगात आल्यानंतर म्हणजेच दि. ०१.०७.२००५ पासून १००% पेक्षा अधिक असलेल्या महागाई भत्त्याची रक्कम निश्चित महागाई भत्ता (Fixed DA) म्हणून समजण्यात यावी अशी मागणी कामगार संघटनांनी केली आहे. तथापि, अशा प्रकारची कोणतीही मागणी केंद्र शासन व राज्य शासनामध्ये मान्य करण्यात आलेली नाही. यास्तव महानगरपालिकेमध्ये सदर मागणी मान्य करणे अनुचित होईल असे समितीचे मत आहे.

# समितीने केलेल्या अन्य सर्वसाधारण शिफारशी

1) **कामगार - 'समान काम-समान वेतन'**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी परिपत्रक क्र.साप्रवि/उपप्रले(आस्था-२)/आरजीसेल क्र.०७, दि.३०.०९.२०११ अन्वये प्रसारित करण्यात आल्या.

यामध्ये शिफारस क्रमांक १२ अनुसार दि. ०१.०४.२००५ रोजी व त्यानंतर महापालिकेच्या सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसंदर्भात खालील तरतूद करण्यात आली आहे.

अनु क्र.४ दि.०१.०९.२०११ नंतर 'ड' प्रवर्गातील नियुक्त होणा-या कर्मचा-यांना –

(अ) एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण – वेतन बँड पीबी-१ रु.५२०० ते २०२०० अधिक ग्रेड वेतन रु. १८०० अनुज्ञेय असेल.

(ब) एस.एस.सी. पेक्षा कमी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना वेतन बँड-१ एस रु.४४४० – ७४४० अधिक ग्रेड वेतन रु.१३०० अनुज्ञेय असेल. अशा कर्मचा-यांनी एसएससी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्यांना पेबँड -१ व ग्रेड वेतन रु. १८०० परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात याव्या.

कामगार संघटनांच्या मागणीचा विचार करुन यापुढे दि.०१.०९.२०११ नंतर संबंधित Grade Code मध्ये नियुक्त झालेल्या सर्व चतुर्थ श्रेणी कामगारांना परिपत्रक क्र. साप्रवि/ उपप्रमुख लेखापाल(आस्था.२)/आरजीसेल/०७, दि.३०.०९.२०११ मध्ये जोडपत्र-१ नमूद केलेली पीबी-१ रु.५२००-२०२०० ही वेतनश्रेणी व संबंधित ग्रेड कोड अनुसार अनुज्ञेय असलेले श्रेणीवेतन अनुज्ञेय होईल. (एस.एस.सी. उत्तीर्ण कर्मचा-यांना दिलेली वेतनश्रेणी).

सर्व कामगारांच्या वेतनात समानता आणल्यामुळे यापुढे एस.एस.सी.उत्तीर्ण उमेदवारांसाठी / एस.एस.सी.अनुत्तीर्ण उमेदवारांसाठी वेगवेगळी श्रेणीवेतन योजना लागू राहणार नाही. एस.एस.सी. उत्तीर्ण कामगारांना दिलेले श्रेणीवेतन एस.एस.सी.अनुत्तीर्ण असलेल्या कामगारांना सुध्दा लागू होईल.

**2) अ-सुरक्षा रक्षक कर्मचारी - वेतन विसंगती**

६व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीच्या वेळी, विहित कार्यपध्दतीप्रमाणे वेतन निश्चिती करत असताना ब-याच प्रकरणी सेवाज्येष्ठ असलेल्या सुरक्षा रक्षकांचे मूळ वेतन त्यांच्यापेक्षा सेवा कनिष्ठ असलेल्या सुरक्षा रक्षकांपेक्षा कमी होत आहे असे निदर्शनास आले.

सुरक्षा रक्षकांच्या संघटनेमार्फत वेतन विसंगती समिती २०१९ व वेतन विसंगती समिती २०२२ समोर 'सुरक्षा रक्षक' या संवर्गातील वेतन विसंगती बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या.

याबाबत वेतन विसंगती समिती २०१९ यांनी दोन महिन्यांच्या आत सदर तक्रारीचे निवारण करण्यात यावे असे आदेश दिले होते. तथापि, याबाबत तक्रार निवारण झाले नसल्याचे निदर्शनास आले.

सन १९८६ व त्यानंतर नियुक्त झालेल्या विविध बॅचमधील सुरक्षा रक्षकांच्या वेतनाची, सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती करत असताना, ज्या ज्या प्रकरणी त्यांच्यापेक्षा सेवाकनिष्ठ असलेल्या (त्यांच्या नंतर सेवेत रुजू झालेल्या) सुरक्षा रक्षकांचे वेतन जास्त आहे त्या त्या प्रकरणी ही"वेतन विसंगती" आहे असे निदर्शनास आल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियम (एम.एस.आर.) मधील नियमांचा/ तरतूदींचा वापर करुन, सेवाजेष्ठ कर्मचा-यास त्यांच्यापेक्षा सेवाकनिष्ठ असलेल्या कर्मचा-याच्या वेतनाएवढे वेतन देऊन, वेतन निश्चिती करण्यात यावी. याकरिता उप प्रमुख लेखापाल (आस्थापना-२) वे.सु.कक्ष किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाची मंजूरी अथवा अभिप्राय आवश्यक नाहीत.

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने संबंधित लेखा अधिकारी (रजा पडताळणी विभाग) यांनी सुरक्षा खात्यातील प्रलंबीत प्रकरणांत तयार केलेल्या वेतन विसंगती विवरणपत्रांची पडताळणी करुन १ महिन्याच्या आत वेतन निश्चिती प्रपत्र तपासणीची कार्यवाही पूर्ण करावी व तदनंतर खातेप्रमुखांची मंजूरी प्राप्त करण्यात यावी अशी शिफारस समितीने केली आहे.

**2) ब - कामगार संघटनांनी, दि.०१.०१.२००५ रोजी नियुक्त झालेल्या सुरक्षा रक्षकांना देण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ काढून घेण्याबाबत घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत दिलेले निवेदन-**

सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी सुधारणेबाबतचे परिपत्रक क्र.साप्रवि/उपप्रले/आस्था.२/आरजीसेल/०७, दि.३०.०९.२०११ मधील तरतूदीनुसार वेतनवाढीबाबत खालीलप्रमाणे सूचना दिल्या होत्या.

"दि.०१.०१.२००६ रोजी सुधारित वेतनश्रेणी अंमलात आल्यानंतर सुधारित वेतनश्रेणी संरचनेमध्ये दि.१ जुलै रोजी सहा अथवा अधिक महिने पूर्ण करणा-या कर्मचा-यांना १ जुलै रोजी

वेतनवाढ अनुज्ञेय होईल. मात्र दि.०२.०१.२००६ ते दि. ३०.०६.२००६ या कालावधीत असुधारित वेतनश्रेणीत वार्षिक वेतनवाढ मिळाली असली तरी सुधारित वेतनश्रेणी संरचनेत वार्षिक वेतनवाढ दि. १ जुलै २००७ रोजीच देय होईल."

परिपत्रक क्र. साप्रवि/उपप्रले/आस्था.२/ आरजीसेल/२७ दि. १४.०३.२०१४ अनुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली.

" दि.०१.०७.२००५ / दि.०१.०१.२००६ रोजी सहाव्या वेतन आयोगाधारीत सुधारित वेतनश्रेणी अंमलात आल्यानंतर कर्मचा-यांना १ जुलै रोजी वेतनवाढ अनुज्ञेय होईल. म्हणजेच दि.०१.०७.२००५ / दि.०१.०१.२००६ रोजी सुधारित वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करण्यात आलेल्या कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी संरचनेत वार्षिक वेतनवाढ दिनांक १ जुलै २००६ रोजी देय होईल."

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये राज्य शासनाच्या धर्तीवर दि.०१.०७.२००५ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करण्यात आल्या व वार्षिक वेतनवाढ दिनांक १ जुलै असा ठरविण्यात आला.

दिनांक ०१.०१.२००६ रोजी ज्यांची वेतनवाढ देय होती अशा कोणत्याही संवर्गातील अधिका-यांना / कर्मचा-यांनाही वार्षिक वेतनवाढ देण्यात आली नाही.

दिनांक ०१.०१.२००५ रोजी नियुक्त झालेल्या सुरक्षा रक्षकांना सहा महिन्यांच्या अर्हताकारी सेवेनंतर लगेचच दि.०१.०७.२००५ रोजी सुधारित वेतनश्रेणीचा लाभ देय झाला आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे असे म्हणता येणार नाही.

त्यांचे सदर तरतूदीनुसार दि.०१.०१.२००५ रोजी नियुक्त झालेल्या सुरक्षा रक्षकांना सहाव्या वेतन आयोगात दि.०१.०१.२००६ रोजी वेतनवाढ देणे संयुक्तिक नाही. त्यामुळे त्याची शिफारस करण्यात आली नाही.

परिपत्रक क्र.साप्रवि/उपप्रले/आस्था.२/आरजीसेल/२७, दि.१४.०३.२०१४ मधील तरतूदी कायम करण्यात येत आहेत.

**2) क - कामगार संघटनांनी, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा दलामध्ये काम करणा-या सुरक्षा रक्षक यांच्या वेतन सुधारणेबाबत दिलेले निवेदन-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील सुरक्षा दलामध्ये काम करणा-या सुरक्षा रक्षक यांना दहा वर्षे सेवा झालेल्या सुरक्षा रक्षकांना मुख्य सुरक्षा रक्षक पदाची वेतन श्रेणी दिली जाते. तदनंतर दहा वर्षे पूर्ण झालेल्या सुरक्षा रक्षकांना 'जमादार' पदाची वेतनश्रेणी दिली जाते. सदर आस्थापेनवर पूर्वी कार्यरत असलेले 'सुरक्षा सहाय्यक' हे पद पुनर्जिवित करुन पुढील दहा वर्षे पूर्ण झाल्यांनतर सदर पदास वेतनश्रेणी देण्याची मागणी करण्यात आली.

उपरोक्त मागणीमध्ये नमूद करण्यात आलेले 'सुरक्षा सहाय्यक' हे पद या संवर्गाच्या पदशृंखलेमध्ये नाही. यास्तव पदोन्नती शृंखलेमध्ये नसलेल्या पदावर कालबध्द पदोन्नती देण्याची शिफारस करता येत नाही.कर्मचा-याची ३० वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर कालबध्द पदोन्नतीसाठी पद उपलब्ध नसल्यास, एकाकी पदानुसार पुढील पदोन्नतीची वेतनश्रेणी / श्रेणीवेतन देय करण्यात यावी.

**3) बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 मधील नियम क्र.32 नुसार विकल्प -**

बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 मधील नियम क्र.३२ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या वेतन निश्चितीबाबत विकल्पाची निवड, कर्मचा-यांच्या बढतीच्या / पदोन्तीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

तथापि, ब-याच प्रकरणात, पदोन्नतीच्या आदेशामध्ये विकल्प निवडीचा उल्लेख करण्यात आला नसल्याने किंवा कर्मचा-यांना / अधिका-यांना विकल्प व त्याचे फायदे याबाबत पुरेशी माहिती / मार्गदर्शन नसल्याने विकल्प विहित कालावधीत देण्यात आला नाही असे निदर्शनास येते व त्यामुळे कर्मचा-याचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान झाल्याची किंवा दोन कर्मचा-यांच्या वेतनामध्ये तफावत निर्माण झाल्याची प्रकरणे, वैयक्तिकरित्या तसेच संघटनांमार्फत समितीसमोर सादर करण्यात आली. याबाबत कामगार / कर्मचारी संघटनांनी मोठया प्रमाणात तक्रारी सादर केल्या.

बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 मधील नियम क्र.३२ नुसार पदोन्नती विकल्प न दिल्यामुळे ज्या कर्मचारी / अधिकारी यांचे आर्थिक नुकसान होत असेल अशी प्रकरणे आस्थापना विभागाच्या किंवा कर्मचा-याच्या निदर्शनास आल्यास कर्मचा-याचा अर्ज प्राप्त करुन पूर्वलक्षी प्रभावाने कर्मचा-यास सुयोग्य / फायदेशीर विकल्पाचा फायदा देऊन पदोन्नतीची वेतन निश्चिती करण्यात यावी व त्याच्या वेतनामधील तफावत दूर करण्यात यावी व यापूर्वीची अशी प्रकरणे तात्काळ निकाली काढावी. याबाबतीत एम.एस.आर.-३२ मधील विकल्प एक महिन्याच्या आत सादर करण्याची अट शिथिल करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

तसेच भविष्यात संबधित आस्थापना विभागाने कर्मचा-यांना योग्य ते मार्गदर्शन करुन / अवगत करुन कर्मचा-याला फायदेशीर होईल तो पर्याय उपलब्ध करुन पदोन्नतीची वेतन

निश्चिती करावी अशा सूचना सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात याव्या जेणेकरुन अशा प्रकारची वेतन विसंगती प्रकरणे भविष्यात उद्भवणार नाहीत.

किंबहूना समितीची अशी धारणा आहे की जो विकल्प कर्मचारी / अधिकारी यांना फायदेशीर आहे, तोच विकल्प कर्मचारी / अधिकारी निवडणार. यास्तव अशा प्रकारचा विकल्प निवडण्याची पध्दत बंद करुन कर्मचारी / अधिकारी यांना फायदेशीर विकल्प प्रशासनाने अंमलात आणणे आवश्यक आहे.

या दृष्टीकोनातून, अशा प्रकारची प्रकरणे उद्भवू नयेत व त्यामुळे प्रशासनाचे काम व कर्मचारी / अधिकारी यांचे काम वाढू नये म्हणून कर्मचारी / अधिकारी यांना, फायदेशीर विकल्प, आस्थापना विभागामार्फत देण्याबाबतची कार्यपध्दती अंमलात आणण्याची तसेच कर्मचा-याकडे विकल्प मागण्याची पध्दत बंद करण्याची समितीने शिफारस केली आहे. 'क्ष'

उपरोक्त 'क्ष' च्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 मधील नियम क्र.32 मध्ये बदल करणे आवश्यक असल्याने त्या बदलाबाबत संबंधित विभागामार्फत स्थायी समिती / महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त करून महाराष्ट्र शासनाकडे पुढील मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**4) एकाकी पद – कालबध्द पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना -**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये कालबध्द पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे.

तदनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-यांची एकाच पदावरील सातत्याची सेवा १२ वर्षे किंवा अधिक झाली आहे अशा कर्मचा-यास पदोन्नती साखळीतील त्या पदाच्या पदोन्नतीच्या उच्च पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय होते.

ज्या कर्मचा-यांना पदोन्नती साखळीत पद उपलब्ध नाही अशा एकाकी (isolated) पदावरील कर्मचा-यांना / अधिका-यांना परिपत्रक क्र.साप्रवि/वेसुकक्ष/०३, दि.२४.०७.२००७ मध्ये व क्र.साप्रवि/वेसुकक्ष/१६, दि.०१.०३.२०१६ मध्ये नमूद करण्यात आलेली वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात येते. परिपत्रक क्र.साप्रवि/वेसुकक्ष/१६, दि.०१.०३.२०१६ मध्ये श्रेणीवेतन रु.१८००/- असलेल्या एकाकी पदाला रु.१८५०/- व रु.१९००/- असे श्रेणीवेतन देय करण्यात आले.

तथापि एकाकी पदांसाठी १२/२४ वर्षांनी कालबध्द पदोन्नती करिता मा.श्री.व्ही. गिरीराज निवृत्त सनदी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सातवा वेतन

आयोग वेतन सुधारणा समिती २०१९ ने रु.१०० / २०० रुपयांची वाढ सुचविली आहे. त्यानुसार रु.१८००/- श्रेणीवेतन असलेल्या एकाकी पदास पहिला लाभ रु.१९००/- श्रेणीवेतन व त्या पुढील दुसरा लाभ रु.२०००/- श्रेणीवेतन अशी शिफारस केली होती. मात्र सदर श्रेणीवेतनानुसार सातव्या वेतन आयोगाच्या Pay matrix मध्ये वेतन निश्चिती करताना सदर कर्मचा-यांचे मूळ वेतन कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर विसंगती दूर करण्याबाबत कामगार संघटनांनी समितीकडे मागणी केली होती.

मा. श्री. व्ही. गिरीराज समितीने दिलेल्या शिफारशीनुसार श्रेणीवेतन रु.१८००/- असलेल्या एकाकी पदांस श्रेणीवेतन रु.१९००/- सुचविले आहे. त्यामुळे असे लक्षात येते की याप्रमाणे वेतन निश्चिती केल्यास येणारे नवीन मूळ वेतन पूर्वीच्या (श्रेणीवेतन रु.१८५०/-) मूळ वेतनापेक्षा कमी आहे. त्यामुळे संबंधित कर्मचा-यांकडून वेतन वसूली करणे क्रमप्राप्त ठरले.

यास्तव अशा प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचा-याचे नुकसान टाळण्यासाठी त्याचे वेतन नवीन वेतनश्रेणीच्या पुढील टप्प्यावर निश्चित करण्यात यावे.

सदरच्या अनुषंगाने कर्मचा-यांस यापूर्वी देण्यात आलेले श्रेणीवेतनानुसार सातव्या वेतन आयोगातील Pay matrix Table मध्ये निश्चित झालेले मूळ वेतन मा.श्री.व्ही. गिरीराज समितीने नवीन श्रेणीवेतन सुचविल्याने कमी वेतनावर होत असल्यास खालील उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे, कर्मचा-यास नवीन श्रेणीवेतनाच्या Pay matrix Table मधील पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करण्यात यावे.

वरील मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी खालील काही उदाहरणे नमूद करण्यात येत आहे.

१) श्री. राकेश गणपत चिपटे

| | | | | Before (RGCELL/07 dtd.11.07.2022) | | | | After (RGCELL/07 dtd.11.07.2022) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Basic | GRP | Total | | | Basic | GRP | Total |
| 01.01.2016 | | | 6330 | 1800 | 8130 | | | 6330 | 1800 | 8130 |
| | | | | | 2.57 | | | | | 2.57 |
| | | | | | 20894.1 | | | | | 20894.1 |
| 01.01.2016 | | M9 | | | 20900 | | M9 | | | 20900 |
| 01.07.2016 | | | | | 21500 | | | | | 21500 |
| 01.07.2017 | | | | | 22100 | | | | | 22100 |
| 01.07.2018 | | | | | 22800 | | | | | 22800 |
| 01.07.2019 | | | | | 23500 | | | | | 23500 |
| 01.07.2020 | | | | | 24200 | | | | | 24200 |
| 08.10.2020 | T.B. | | | | 24900 | | | | | 24900 |
| **Fixation** | | M10 | | 1850 | 25400 | | M11 | | 1900 | 25200 |
| **Next Stage** | | | | | | | **M11** | **सुधारित वेतन निश्चिती यानुसार करण्यात यावी** | | **26000** |

२) श्री. रमेश धोंडू लोटे

| | | | Before (RGCELL/07 dtd.11.07.2022) | | | | | After (RGCELL/07 dtd.11.07.2022) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Basic | GRP | Total | | | Basic | GRP | Total |
| 01.01.2016 | | | 6840 | 1800 | 8640 | | | 6840 | 1800 | 8640 |
| | | | | | 2.57 | | | | | 2.57 |
| | | | | | 22204.8 | | | | | 22204.8 |
| 01.01.2016 | | M9 | | | 22800 | | M9 | | | 22800 |
| 01.07.2016 | | | | | 23500 | | | | | 23500 |
| 01.07.2017 | | | | | 24200 | | | | | 24200 |
| 01.07.2018 | | | | | 24900 | | | | | 24900 |
| 06.11.2018 | T.B. | | | | 25600 | | | | | 25600 |
| **Fixation** | | M10 | | 1850 | 26200 | | M11 | | 1900 | 26000 |
| **Next Stage** | | | | | | | **M11 - सुधारित वेतन निश्चिती यानुसार करण्यात यावी.** | | | **26800** |

5) **वेतन विसंगती प्रकरणे -**

प्रमुख लेखापालांच्या शहर / पश्चिम उपनगरे / पूर्व उपनगरे या विभागात तसेच प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) या विभागांमध्ये नियमांचा वापर / परिपत्रकांचा अर्थ लावणे / सेवा नियमावलीमधील तरतूदी याबाबत एकवाक्यता असणे आवश्यक आहे. याकरिता खातेप्रमुखांनी या विषयांत निपुण असणा-या अधिका-यांची एकत्रित बैठक घेऊन सर्व संबंधितांना मार्गदर्शन करुन उचित आदेश देणे आवश्यक आहे.

कर्मचा-याने / अधिका-यांनी निवेदने / वेतन विसंगती प्रकरण सादर केल्यानंतर कमीतकमी ३ महिन्यांच्या कालावधीत प्रकरण मंजूर / नामंजूर करुन कर्मचा-यास / अधिका-यांना अवगत करणे आवश्यक राहील अन्यथा संबंधित कर्मचा-यांची जबाबदारी निश्चित करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

याबाबत केलेल्या कार्यवाहीचा मासिक पाठपुरावा वरिष्ठ अधिकारी यांनी घ्यावा अशी शिफारस करण्यात आली आहे.

6) **प्राथमिक शिक्षक त्रिस्तरीय वेतनश्रेणी योजना**

बृन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी / अधिकारी यांना दि.०७.०७.२००५ पासून कालबध्द पदोन्नतीची योजना लागू करण्यात आली. सदर बाबत परिपत्रक क्र.साप्रवि / वेसुकक्ष / 03, दि.24.07.2007 मध्ये निर्देश देण्यात आलेले आहेत व त्या योजनेमध्ये पुढील विविध परिपत्रकांव्दारे सुधारणा करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिक्षक प्रवर्गाला राज्य शासनाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी देय करण्यात आली आहे. सदर बाबतचे निर्देश परिपत्रक क्र.साप्रवि/उप प्रमुख लेखापाल (आस्था-2)/आरजीसेल/१४, दि.२१.११.२०११ अन्वये देण्यात आलेले आहेत. त्यामुळे शिक्षक प्रवर्गांना कालबध्द पदोन्नतीची योजना अनुज्ञेय नाही. याबाबत उपरोक्त परिपत्रकात तसा स्पष्ट उल्लेख केला गेला आहे. तदनुषंगाने प्राथमिक शिक्षक संवर्गाने केलेली, इतर महानगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे कालबध्द पदोन्नतीची योजना लागू करण्याची विनंती मान्य करता येणार नाही.

7) **श्रेणीवेतनामध्ये वाढ झाल्यानंतर करण्यात येणारी वेतननिश्चिती -**

यापूर्वीच्या वेतन विसंगती समितीने किंवा सदर समितीने काही संवर्गाच्या श्रेणीवेतनामध्ये वाढीची शिफारस केली आहे. तदनुषंगाने अशा कर्मचा-यांची सहाव्या वेतन आयोगानुसार व नंतर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करावी लागेल. यामध्ये सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करत असताना कर्मचा-यांची **मा.गिरीराज समितीने तसेच मा.डॉ.रमानाथ झा समितीने** शिफारस केलेल्या, श्रेणीवेतनाच्या अनुषंगाने यापूर्वी सातव्या वेतन आयोगाच्या

तरतूदीनुसार केलेल्या वेतन निश्चिती पेक्षा कमी वेतनावर वेतन निश्चिती होत आहे असे निदर्शनास आल्यास अशा प्रकरणी संबंधित कर्मचा-यांचे यापूर्वी आहरीत केलेले वेतन संरक्षित करणे आवश्यक आहे. याकरिता या कर्मचा-यांची सुधारीत श्रेणीवेतनाच्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करताना यापूर्वी आहरीत केलेल्या वेतनापेक्षा कमी वेतनावर वेतन निश्चिती होत असल्यास संबंधित कर्मचा-यांची वेतन निश्चिती Pay Matrix Table मधील लगतच्या पुढील टप्प्यावर करण्यात यावी.

८) **योग्य श्रेणीवेतन (Grade Pay) न दिल्यामुळे पदोन्नतीच्या वेळेस अनेक टप्प्यावरील कर्मचारी एकाच टप्प्यावर एकवटणे –**

सातव्या वेतन आयोगामध्ये निर्धारित करण्यात आलेले Pay Matrix शासनाच्या धर्तीवर तयार करण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक संवर्गाचे श्रेणीवेतन सुध्दा राज्य शासनाच्या धर्तीवर अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या Pay Matrix मुळे कर्मचारी पदोन्नतीच्या वेळेस एकाच टप्प्यावर एकवटत आहेत. तथापि,सदर बाब दूर करावयाची झाल्यास, सातव्या वेतन आयोगाच्या Pay Matrix मध्ये बदल करावा लागेल, जे शक्य नाही. यास्तव याबाबत कोणतीही शिफारस करता येत नाही. प्रसंगवशात असे नमूद करण्यात येते की सातव्या वेतन आयोगामध्ये कर्मचा-यांच्या वेतनामध्ये भरीव वाढ झाली आहे. यास्तव उपरोक्त मुद्दयामुळे वेतनात नुकसान झालेले नाही.

९) **३० जून रोजी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना नाकारण्यात येत असलेली वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्याबात महानगरपालिकेतील संघटनांनी समितीकडे केलेली मागणी -**

३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या / होणा-या कर्मचा-यांना १ जुलै रोजीच्या वेतनावर काल्पनिकरित्या मंजूर करुन सेवानिवृती वेतनाचा लाभ हया संबंधात महाराष्ट्र शासनाने वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-२०२३/अ.क्र.१३/सेवा-३,दि.२८.०६.२०२३ नुसार आदेश निर्गमित केलेले आहेत. महानगरपालिकेतील बहुतेक कामगार संघटनांनी याबात समितीकडे मागणी सादर केली होती. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने या संदर्भात सदर शासन निर्णयातील तरतूदी महानगरपालिकेतील कर्मचा-यांना लागू करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.

तद्अनुषंगाने परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/13 दि.11.10.2023 निर्गमित करण्यात आले आहे.

10) **परिपत्रक क्र.उपप्रमुख लेखापाल (आस्था.२)/आरजीसेल/०६, दि. २०.०७.२०१९ मधील मुद्दा क्र. ६ मध्ये सुधारणा करणेबाबतचे संघटनेचे निवेदन -**

परिपत्रक क्र. उपप्रमुख लेखापाल (आस्था.२)/ आरजीसेल/०६, दि. २०.०७.२०१९ मधील मुद्दा क्र. ६ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असून त्यासाठी 'कार्यरत असलेल्या पदाच्या पे-मॅट्रीक्स मध्ये एक इंक्रिमेंट दिल्यावर येणा-या रकमेच्या लगत पुढील उच्च वेतनावर पदोन्नतीच्या पदाच्या पे-मॅट्रीक्स मध्ये वेतन निश्चिती करण्यात यावी' असा शब्दप्रयोग परिपत्रकात करणे आवश्यक आहे अशी मागणी संघटनेने केली आहे.

परिपत्रक क्र. उपप्रमुख लेखापाल (आस्था.२)/ आरजीसेल/०६, दि. २०.०७.२०१९ अन्वये, शासनाच्या धर्तीवर सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी वितरीत करण्यात आल्या. सातव्या वेतन आयोगाच्या तरतूदी शासन अधिसुचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आहेत. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे बदल करण्याचा विचार करणे योग्य होणार नाही.

11) **पदोन्नती शृंखलेतील पुढील पदाच्या अर्हता / पात्रता निकष पूर्ण न करणा-या कामगार – कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार पुढील टप्प्याचा लाभ मिळण्याबाबचे संघटनेचे निवेदन–**

राज्य शासनाने कालबद्ध पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना मंजूर करताना पदोन्नतीच्या प्रक्रिया पूर्ण करुनच आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबत आदेशीत केले आहे. त्यामुळे सदर संघटनेने केलेल्या मागणीचा विचार करता येत नाही.

12) **बृहन्मुंबई महानगरपालिकेतील काही पदांची पदनामे राज्य शासनामधील पदांच्या धर्तीवर बदलण्याची संघटनेने केलेली मागणी –**

पदनामे बदलण्याची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

समितीने केलेल्या मुद्देनिहाय शिफारशीमधील मुद्दा क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या समितीकडे सदर काम सोपविण्यात यावे.

13) **एकाच वेतनश्रेणी व श्रेणीवेतनामध्ये बरेच संवर्ग आल्याने पदोन्नतीमध्ये निर्माण होणा-या अडचणींबाबत –**

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील बहुतांश तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांमध्ये पदोन्नतीपूर्वीचे व पदोन्नतीनंतरचे श्रेणीवेतन सारखेच असल्याने तृतीय व चतुर्थ श्रेणी संवर्गाच्या पदोन्नतीमध्ये ब-याच अडचणी होत असल्याचे कामगार संघटनांनी निदर्शनास आणले. एकाच वेतनश्रेणी मध्ये बरेच संवर्ग आल्याने सदर अडचणी निर्माण होत आहेत. यास्तव तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या पदोन्नतीमधील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने खालील वेतनश्रेणी संकेतांकांच्या श्रेणीवेतनामध्ये बदल करण्यात येत आहे.

| S.No. | Grade Code | 1995 Payscales | Pre-revised Pay (2000-05) | Pay band | Grade Pay (Rs.) | Proposed Grade Pay (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | C51 | 3620 - 4820 | 4165 - 5555 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1900 | 1950 |
| 2. | C47 | 3990 - 5230 | 4590 - 6010 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2000 |
| 3. | D13 | 3990 - 5480 | 4590 - 6295 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2000 |
| 4. | C43 | 4000 - 5290 | 4615 - 6090 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 5. | C37 | 4000 - 5570 | 4600 - 6410 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 6. | D07 | 4000 - 5660 | 4600 - 6510 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 7. | C27 | 4020 - 6830 | 4495 - 7650 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2100 |
| 8. | C45 | 4040 - 5180 | 4645 - 5960 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 9. | D11 | 4040 - 5560 | 4645 - 6395 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 10. | C33 | 4040 - 5760 | 4645 - 6625 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2100 |
| 11. | D05 | 4050 - 6070 | 4535 - 6815 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 1950 | 2100 |
| 12. | D03 | 4050 - 6410 | 4535 - 7190 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2100 |
| 13. | C31 | 4050 - 6750 | 4565 - 7560 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2100 |
| 14. | C25 | 4120 - 6830 | 4615 - 7650 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2100 |
| 15. | D01 | 4540 - 6830 | 5085 - 7650 | PB1 – Rs. 5200 - 20200 | 2000 | 2400 |

सदर सुधारणा उपरोक्त वेतनश्रेणी संकेतांक असणा-या सर्व प्रवर्गांना / संवर्गांना अनुज्ञेय होईल.

**उपरोक्त सुधारणा करत असताना काही वेतनश्रेणी संकेतांकांच्या श्रेणीवेतनामध्ये यापूर्वीच किंवा या अहवालात यापेक्षा जास्त श्रेणीवेतन देय झाले असल्यास, जास्त असेल ते श्रेणीवेतन ग्राहय धरण्यात यावे.**

**14) वेतन सुधारणेनुसारच्या वेतन निश्चितीची व थकबाकीच्या परिगणनाची कामे करण्यासाठी NIC ने विकसित केलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करण्याबाबत समितीकडून शिफारस करण्यात आली आहे.**

**15) बक्षी समिती अहवाल –**

शासन निर्णय क्रमांक वेपुर ११२१/प्र.क्र.४/सेवा, दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ अन्वये राज्य वेतन सुधारणा समिती २१७ च्या अहवाल खंड – २ मधील वेतनश्रेणी विषयक व आनुषंगिक शिफारशी प्रसारित झाल्या आहेत. (श्री.के.पी.बक्षी, सेवानिवृत्त अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील राज्य वेतन सुधारणा समिती).

विविध कामगार संघटनांनी या शिफारशी लागू करण्याची विनंती केली आहे. तथापि, सदर शिफारशी सातव्या वेतन आयोगाच्या संदर्भात करण्यात आल्या आहेत. सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याने त्याबाबतची शिफारस करता येत नाही. याबाबत प्रशासनामार्फत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात यावा.

## सह आयुक्त पदाची वेतनश्रेणी

| | |
|---|---|
| **Pay Band** | **PB4 - 37400-67000** |
| **Pay in Pay Band** | **41500** |
| **Grade Pay** | **9400** |
| **Entry Level** | **50900** |
| | **2.67** |
| **Matrix Level** | **M45** |
| **1** | 135900 |
| **2** | 140000 |
| **3** | 144200 |
| **4** | 148500 |
| **5** | 153000 |
| **6** | 157600 |
| **7** | 162300 |
| **8** | 167200 |
| **9** | 172200 |
| **10** | 177400 |
| **11** | 182700 |
| **12** | 188200 |
| **13** | 193800 |
| **14** | 199600 |
| **15** | 205600 |
| **16** | 211800 |
| **17** | 218200 |
| **18** | 224700 |